# लातूर भूकंप

LATUR BHUKAMP

सांज दैनिक : शनिवार – ५ ऑगस्ट २०२३

वर्ष – ३७ वे

अंक – १२७

पाने – ४

किंमत २ रूपये

E-Mail : dailybhukamp@gmail.com

RNI No. MAHMAR/2012/42770

☎ : -9422072823,251822

संपादक: अशोक चिंचोले

epaper.dainikbhukamp.com







## संपादकीय......

## जनमत काय, जाणा तर खरं!

आजचा लातूर जिल्हा एकत्रित उस्मानाबाद जिल्ह्यात होता. जिल्ह्याचे ठिकाण असलेले उस्मानाबाद ते जळकोट उदगीर हे मोठे अंतर होते. भौगोलिक दृष्ट्या हा जिल्हा मोठा होता. त्यावेळी लातूर जिल्हा करावा ही मागणी पुढे आली. ही मागणी आजच्या लातूर जिल्ह्यातील तत्कालीन नागरिक,व्यापारी, विद्यार्थी, तरुण यांनी लावून धरली, जिल्हा निर्माण व्हावा यासाठी आंदोलने केली. ज्याची गरज होती. त्यातूनच त्यावेळच्या लोकप्रतिनिधींना देखील स्वतंत्र लातूर जिल्ह्यासाठी पुढाकार घ्यावा लागला. तत्कालीन मुख्यमंत्री बॅरिस्टर अंतुले यांना डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर, विलासराव देशमुख, व लातूरकरांच्या आग्रही मागणी आंदोलनानंतर लातूर जिल्हा निर्मिती करावी लागली. आता लातूर पासून जिल्ह्यातील शेवटचे गाव ७० ते ७५ किमीच्या आत आहे.जिल्हा निर्मिती वेळी असलेल्या सहा तालुक्यानंतर शिरूर अनंतपाळ, चाकूर, रेनापुर जळकोट हे चार तालुके निर्माण करण्यात आले, हे चार तालुके निर्माण व्हावेत यासाठी जनआंदोलन झाली असे आठवत नाही. किंवा पाहण्यात वाचण्यात आलं नाही. अशात म्हणजे आत्ता लातूर जिल्ह्यात विशेष करून निलंगा तालुक्यात आहे त्या तालुक्याचे विभाजन करावे, कासार शिरशी व औराद शहाजानी ला तालुक्याचा दर्जा द्यावा यासाठी राजकीय आंदोलन होत आहेत. या आंदोलनाला दुसऱ्या गटाकडून तीव्र विरोध केला जात आहे. रास्ता रोको, बंद, निवेदन देणे आरोप, प्रत्यारोपाने निलंगा तालुक्यातील वातावरण आता बघून घेऊ! इथपर्यंत पोहोचले आहे. विशेष म्हणजे सत्ताधारी पक्ष भाजपा आमदारांमध्येच हा संघर्ष पेटला आहे.औसा विधानसभा मतदारसंघातून (निलंगा तालुक्यातील ६८ गावांचा समावेश आहे. भाजपा आमदार अभिमन्यू पवार निवडून आले आहेत. अर्थातच निलंगा तालुक्यात आमदार पवार यांनी आपली स्पेस निर्माण केली आहे .मी निवडणुकीत कासारशी तालुका निर्मितीचे आश्र्वासन दिले आहे, ते मी पूर्ण करणारच! कोणात हिंमत असेल तर त्यांनी अडवून दाखवावे, असे त्यांनी प्रति आव्हान दिले आहे. आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर गटाने कासारसिरशी व ६८ गावांचा समावेश असलेल्या निलंगा कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीत पूर्ण पॅनल निवडून आणले. ६८ गावे औसा मतदारसंघात असली तरी पंचायत समितीला निलंगा मध्ये आहेत. पंचायत समितीत आमदार संभाजीराव पाटील गटाचे वर्चस्व आहे. कासारसिरशी तालुका व्हावा मागणीवरून आंदोलन होत असताना आता औराद शहाजनी तालुका करावा यासाठी आंदोलन चालू आहे. हे सर्व आंदोलन राजकीय नेते कार्यकर्ते यांच्या राजकीय वर्चस्वासाठी चालू आहेत का? अशी चर्चा लोक करीत आहेत. आहे त्या निलंगा तालुक्यातून आणखी दोन तालुके निर्माण व्हावेत यासाठी जनता रस्त्यावर उतरली आहे, जन आंदोलन होत आहेत असेही काही चित्र दिसत नाही. मुळात आजच्या निलंगा तालुक्यातील एकूण १६२ गावे (कासारसिरशी विभागातील ६८ गावे धरून) आहेत निलंगा ते कासारसिरसी अंतर २६ किमी आहे. निलंगा ते औराद शहाजानी अंतर २० किमी आहे. निलंगा तालुक्याचे विभाजन करून आणखी दोन तालुके निर्माण केले तर दर दहा किलोमीटर अंतरावर नवीन तालुका लागेल. कासारसिरसी सोबत जी ६८ गावं औसा विधानसभेला जोडली आहेत त्या ६८ पैकी धानोरा, जेवरी, माळेगाव, येलमवाडी, बामणी, लिंबाळा, शिंगनाळ आदि गावे निलंगा शहरापासून चार ते पाच किलोमीटरच्या आत आहेत. त्यांना २४ – २५ किमी अंतरावरील सिरसीला जोडणार का? कासारसिरसी तालुका निर्माण व्हावा साठी आंदोलन होत आहे म्हणून औराद शहाजानी ला तालुका करावा अशी काही जण मागणी करीत आहेत. औराद शहाजानी आणि कासारसिरसी हे दोन्ही गावे कर्नाटक राज्याच्या सीमालगत आहेत. यांना तालुक्याचा दर्जा दिला तर त्यात समाविष्ट करू म्हटल्या जाणाऱ्या गावासाठी तालुक्याचे ठिकाण भौगोलिक दृष्ट्या मध्यवर्ती न राहता एका टोकाला होणार आहे. याच निलंगा तालुक्याचा भाग असलेला शिरूर अनंतपाळ काही वर्षांआदी तालुका झाला. चाळीस गावाचा छोटा तालुका म्हणून हा तालुका विकासाच्या बाबतीत मॉडेल ठरला आहे असे नाही. अद्यापही या तालुक्याच्या ठिकाणी सर्व शासकीय कार्यालय नाहीत, न्यायालय नाही त्यांच्यासाठी शासनाच्या मालकीची कार्यालयं नाहीत, अधिकारी– कर्मचारी यांना राहण्यासाठी निवासस्थान नाहीत. एक काळ होता दळणवळणाची साधने नव्हती, रस्ते नव्हती तरीही एकत्रित निलंगा तालुक्यात लोक आनंदात राहत होते. आता रस्ते दळणवळणाची साधने झाली. बहुतेक कामे, कागदपत्रे ऑनलाईन झाली, व्हाट्सअप, ईमेल, सोशल मीडिया यामुळे पत्रव्यवहार इतर कामासाठी टपाल घेऊन जाणे कमी झाले. लोक पुणे मुंबई हैदराबादला सकाळी निघून रात्री मुक्कामाला परत गावी येऊ लागले. असे असताना प्रशासकीय कामासाठी तालुका दूर होतोय असा दावा करण्यात काही दम दिसत नाही. छोटी छोटी तालुके निर्माण केल्यानंतर त्या तालुक्याचा सर्वांगीण विकास झाला, विकासाचे मॉडेल निर्माण झाले असे कोणी सांगेल का? तसे असते तर शरद पवार कुटुंबीयांनी बारामती जिल्हा केव्हाच केला असता. अकलूज ,सदाशिवनगर, माळीनगर या ग्रामपंचायतीने लातूर सारख्या महापालिकेला लाजवेल असा विकास केला, ग्रामपंचायत असून देखील त्या उत्तम दर्जाच्या नागरी सुविधा देतात, पण ते कधी अकलूजला तालुका द्यावा, नगरपंचायत, नगरपरिषदेचा दर्जा द्यावा अशी मागणी करीत नाहीत. आज निलंगा तालुक्यातुन आणखी दोन तालुके व्हावेत या मागणीसाठी तालुक्याला रणभूमीचे स्वरूप येत आहे. डॉक्टर शिवाजीराव पाटील निलंगेकर यांनी सुमारे पाच सहा दशक राजकारण केले, शक्य तिथे रस्ते, छोटे–मोठे तळे, धरणं ,बंधारे, प्रकल्प, इमारती निर्माण केले, त्यांच्या पुढाकारामुळे लातूर जिल्हा निर्माण झाला. अशा नेत्यास निलंगा तालुक्यातील औराद शहाजानी, कासारसिरला तालुक्याचा दर्जा देणे अवघड नव्हते. आज औराद, सिरसी परिसरात कालवा दुरुस्तीचे प्रश्र्न आहेत,या भागात नेहमी ढगफुटी होते याबाबत संशोधन होण्याची गरज आहे. या भागातील हजारो तरुण रोजगारासाठी हैदराबाद पुणे मुंबईला गेलेला आहे, या भागातील शाळेची अवस्था दयनिय झाली आहे. जिल्हा परिषदेच्या अनेक गावातील शाळांना चांगल्या इमारती देखील नाहीत, विद्यार्थी संख्या कमी होत असल्याने शाळा ओस पडत आहेत.सर्वसामान्य व गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्र्न निर्माण झाला आहे. सिरसी भागातील काही गावात भूगर्भातून नेहमी आवाज येतोय त्या गावाच्या पुनर्वसनासाठी किंवा जनतेच्या मनातील भीती दूर करण्यासाठी प्रयत्न गरजे चे आहेत.तालुका निर्मिती वरून निलंगा तालुक्यात युद्धासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे.खरे तर औराद व कासारसिरसी या दोन्ही शहरात शेतमालावर प्रक्रिया करणारे व प्रत्येक उद्योगात पाच ते दहा हजार युवकांना थेट रोजगार मिळेल असे उद्योग निर्माण होणे गरजेचे आहे. तालुका निर्मितीसाठी शक्ती खर्च करणाऱ्या नेत्यांनी आपली एकत्रित शक्ती पणाला लावून तालुक्याचा विकासाकडे लक्ष दिले तर जनता तुमचे उपकार कधी विसरणार नाही. राजकीय हट्टापायी लातूर नगर परिषदेला महानगरपालिकेचा दर्जा दिला. या शहरात आज नागरी सुविधा अभावी अनेक प्रश्र्न निर्माण झाले आहेत. या शहरातील नागरी समस्या पाहून जनता बा, आपली नगर परिषद बरी! असे म्हणत आहेत. राजकीय अस्तित्वासाठी किंवा एखाद्याची राजकीय अडचण करण्यासाठी आंदोलने करू नयेत. जनता विकास मागते आहे आणि नेते तालुका निर्मिती वरून राजकारण करीत आहेत. खरेच या भागातील गोरगरिबांना मजुरांना, शेतकरी व्यापारी,महिला, भगिनी, युवक, विद्यार्थ्यांना नवा तालुका हवाय का? याबाबत विचार झाला पाहिजे. प्रशासनातील अधिकारी कर्मचारी यांची मत लक्षात घेणे आवश्यक आहे. नव्हे तर एखाद्या तज्ञ समितीकडून या भागामध्ये नवीन तालुक्याची गरज आहे का? याबाबत जनता व प्रशासन यांचा कौल घेणे आवश्यक आहे.कासारशसिरशसी व औराद परिसरातील जनतेला तालुका पाहिजे का? याबाबत देखील निपक्षपातीपणाने एखाद्या एजन्सीने चौकशी करून त्यांचेकडून अहवाल घेण्याची गरज आहे. निलंगा तालुक्याचे विभाजन करून औराद शहाजानी, कासारसिरसी तालुका निर्माण करणे गरजेचे आहे का? हे या परिसरातील जनतेला विचारा तर खरे! जनतेला कशाचे भरोसावर गृहित धरत आहात.

# ‘सैनिकहो तुमच्यासाठी’ उपक्रम प्रत्येक महिन्यात

## जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे



लातूर : देशाचे संरक्षण करण्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावून सेवा करणाऱ्या सैनिकांच्या, माजी सैनिकांच्या समस्या सोडविण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध आहे. यासाठी प्रत्येक महिन्याच्या पहिल्या मंगळवारी तालुका, उपविभाग आणि जिल्हास्तरावर ‘सैनिक हो तुमच्यासाठी’ उपक्रमाचे आयोजन केले जाणार असल्याचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी आज येथे जाहीर केले. महसूल सप्ताह अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित ‘सैनिक हो तुमच्यासाठी’ कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

महसूल सप्ताह अंतर्गत १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट दरम्यान महसूल विभागामार्फत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून जिल्ह्यातील सर्व आजी, माजी सैनिक, माजी सैनिक विधवा पत्नी, शहीद जवानाच्या वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता व त्यांचे अवलंबित यांच्या अडीअडचणींचे निराकरण करण्यासाठी ५ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात ‘सैनिक हो तुमच्यासाठी’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

अपर जिल्हाधिकारी सुनील यादव, निवासी उपजिल्हाधिकारी विजयकुमार ढगे, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल (नि.) शरद पांढरे, अखिल भारतीय माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष कॅप्टन विलास सूर्यवंशी, जय जवान जय किसान माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष शब्बीर दादू सय्यद यांच्यासह सर्व उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यावेळी उपस्थित होते.

महसूल सप्ताह अंतर्गत आयोजित ‘सैनिक हो तुमच्यासाठी’ कार्यक्रमामुळे माजी सैनिक आणि जिल्हा प्रशासन यांच्यामध्ये सुसंवाद होण्यास मदत झाली असून हा संवाद यापुढेही कायम राहील. या कार्यक्रमाच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या माजी सैनिकांच्या समस्या, अडीअडचणी सोडविण्यासाठी मिशन मोडवर प्रयत्न करून स्वतः या अनुषंगाने पाठपुरावा करणार असल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे यांनी सांगितले. तसेच सर्व तहसील कार्यालये, उपविभागीय कार्यालये आणि जिल्हाधिकारी कार्यालयात दर महिन्याच्या पहिल्या मंगळवारी सकाळी ११ ते १२ या कालावधीत माजी सैनिकांच्या समस्या जाणून घेणे, त्या सोडविण्यासाठी ‘सैनिक हो तुमच्यासाठी’ हा उपक्रम राबविण्यात येईल, असे जिल्हाधिकारी यावेळी म्हणाल्या.

माजी सैनिकांनी मांडलेले रस्तेविषयक प्रश्र्न प्राधान्याने सोडविण्याबाबत कार्यवाही केली जाईल. आपण स्वतः सैनिकी शाळेत शिक्षण घेतले असून सैनिकांचे, त्यांच्या कुटुंबाचा त्याग, त्यांना सहन करावा लागणार त्रास याविषयी आपणास जाणीव असल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे यावेळी म्हणाल्या. माजी सैनिकांना शिधापत्रिका देण्याबाबत पाठपुरावा करण्यात येईल. माजी सैनिकांच्या पाल्यांना विविध स्पर्धा परीक्षा, सैनिक भरतीबाबत मार्गदर्शन मिळण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असून माजी सैनिकांना विविध आरोग्य सुविधा देण्यासाठीही नियोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित ‘सैनिक हो तुमच्यासाठी’ कार्यक्रमात जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर–घुगे यांच्या हस्ते जिल्ह्यातील वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता आणि शौर्यपदकधारकांचा गौरव करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती घुगे–ठाकूर यांनी स्टेजवरून खाली येत वीरमाता, वीरपत्नी, तसेच वीरपिता यांचा त्यांच्या आसनाजवळ जावून सत्कार केला. त्यांच्याशी आपुलकीने संवाद साधत समस्या जाणून घेतल्या, तसेच त्या समस्या लवकरात लवकर सोडविण्याची ग्वाही दिली. सैन्यातून सेवानिवृत्त झाल्यानंतर शासनाच्या महसूल विभागात कार्यरत असलेल्या माजी सैनिकांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

‘सैनिक हो तुमच्यासाठी’ कार्यक्रमात जिल्ह्यातील माजी सैनिकांना शासनामार्फत देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीचे धनादेश, प्रमाणपत्रे, दाखले यांचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. यामध्ये पाल्याच्या शिक्षणसाठी शिष्यवृत्ती, वैद्यकीय आणि व्यावसायिक शिक्षणासाठी अर्थसहाय्य, बस प्रवासासाठी मदत, शिधापत्रिका, सातबारा, आठ अ प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, रहिवासी दाखला आदी बाबींचा समावेश होता.

माजी सैनिकांना आमंत्रित करून त्यांचा सन्मान करणे, तसेच त्यांच्या समस्या जाऊन घेण्यासाठी महसूल विभागाने आयोजित केलेला ‘सैनिक हो तुमच्यासाठी’ हा उपक्रम अतिशय समाधानकारक आहे. जिल्हा प्रशासनाच्यावतीने अशा प्रकारचा उपक्रम पहिल्यांदाच होत असल्याबाबत अखिल भारतीय माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष कॅप्टन विजय सूर्यवंशी यांनी राज्य शासन आणि प्रशासनाचे आभार मानले. संघटनेचे औसा तालुका अध्यक्ष कॅप्टन कमलाकर सूर्यवंशी यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी त्यांनी माजी सैनिकांचे विविध प्रश्र्न मांडले.

प्रास्ताविकामध्ये जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल (नि.) श्री. पांढरे यांनी जिल्ह्यातील माजी सैनिक, माजी सैनिक विधवा पत्नी, शहीद जवानाच्या वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता यांना देण्यात येत असलेल्या सुविधांची माहिती दिली. तसेच कार्यक्रम आयोजनाचा हेतू विशद केला. सूत्रसंचालन नीलकंठ जाधव यांनी केले, औसा–रेणापूरचे उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे यांनी आभार मानले. लोकरंग कलामंचने कार्यक्रमाच्या सुरवातीला विविध देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण केले.

## भेटवस्तू विकल्या, माजी पंतप्रधान इम्रान खान यांना तीन वर्षांची शिक्षा

इस्लामाबाद : पाकिस्तानमधील जिल्हा सत्र न्यायालयाने इम्रान खान यांना तीन वर्षांची शिक्षा सुनावली आहे. तोशखाना प्रकरणात ही शिक्षा सुनावण्यात आली आहे.



शिक्षा सुनावल्यानंतर लाहोर येथील जमान पार्क निवासस्थानातून इम्रान खान यांना अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने इम्रान खान यांना १ लाख रुपयांचा दंड ठोठावला असून ५ वर्ष निवडणूक लढण्यास बंदी घालण्यात आली आहे.

पाकिस्तामधील मुस्लीम लीग–नवाझ ( पीएमएल–एन ) पक्षाच्या नेतृत्वाखाली आघाडी सरकारने ऑगस्ट २०२२ मध्ये इम्रान खान यांच्यावर तोशखाना प्रकरणात गुन्हा दाखल केला होता. तेव्हा तोशखाना प्रकरण चर्चेत आले होते. पंतप्रधान असताना इम्रान खान यांनी त्यांना मिळालेल्या भेटवस्तूंची माहिती तोशखाना विभागाकडे उघड केली नाही. तसेच, या भेटवस्तू बेकायदेशीरपणे विकल्याचा आरोप इम्रान खान यांच्यावर करण्यात आला होता.

पाकिस्तानमध्ये तोशखाना विभागाची १९७४ साली स्थापना झालेली आहे. लोकप्रतिनिधींना मिळालेल्या भेटवस्तू नियमाप्रमाणे या विभागात जमा करत माहिती देणं बंधनकारक असते. पण, २०१८ साली सत्तेवर आल्यानंतर इम्रान खान यांनी मिळालेल्या भेटवस्तूंची माहिती तोशखाना विभागाला देण्यास नकार दिला. माहिती दिल्यास अन्य देशांशी असलेल्या संबंधावर परिणाम पडेल, असा दावा इम्रान खान यांनी केला होता. त्यानंतर इम्रान खान यांनी पाकिस्तान निवडणूक आयोगाला पत्र लिहून मिळालेल्या भेटवस्तूंपैकी साधारण ४ भेटवस्तूंची विक्री केल्याचे कबूल केलं होतं.



माजी मुख्यमंत्री डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांची आज पुण्यतिथी, आज निलंगा शहरातील डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास निलंगा तालुका व जिल्हाभरातील विविध पक्ष, कार्यकर्ते, नागरिक यांनी अभिवादन केले. माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, विजय पाटील निलंगेकर यांनीही यावेळी डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर साहेब यांच्या पुतळ्यास अभिवादन केले.

### त्यांच्या मते....

▣ **आम्हाला तीन पायाचं, तीन चाकाचं सरकार म्हणणारे स्वत:ला त्रिशूळ सरकार म्हणतात.**

–भास्कर जाधव

☛ यालाच म्हणतात आपला तो ‘त्रिशूळ’ दुसऱ्याचा ‘रिक्षा’.

▣ **मला वाटतं की मी शरद पवार यांना फार ओळखत नाही.**

–जितेंद्र आव्हाड

☛ मग दादा थोडं तरी ओळखत असतील.

▣ **डोंगर चढून जायला हिम्मत लागते.**

– एकनाथ शिंदे

☛ हिम्मतवाला!

▣ **लोकसभेत गदारोळ चालू असताना मंत्री मीनाक्षी लेखी यांनी खासदारांना शांत रहा नाहीतर तुमच्या घरी ईडी येईल अशी धमकी दिली**

–एक बातमी

☛ ईडी ‘गब्बर’ झालाय.

## विधान परिषदेच्या विरोधी पक्षनेते पदासाठी कॉँग्रेसकडून लॉबिंग

मुंबई : विधानसभेप्रमाणे विधान परिषदेत देखील कॉँग्रेसकडून विरोधी पक्षनेते पदासाठी लॉबिंग सुरू करण्यात आले आहे. संख्याबळाच्या आधारे विरोधी पक्षनेते पद पदरात पाडून घेण्यासाठी पक्षातील आमदारांचे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना पत्र देखील लिहिले. कॉँग्रेसच्या या मागणीनंतर महाविकास आघाडीत बिघाडी? अशी चर्चा पुन्हा एकदा सुरु झाली आहे.

शिवसेनेपाठोपाठ राष्ट्रवादीतल्या फुटीनंतर सभागृहातल्या संख्याबळाचे आकडे बदलले आहे. विरोधी बाकांवर ज्या पक्षाचं संख्याबळ सर्वाधिक, त्या पक्षाचा विरोधी पक्षनेता बनतो. त्यानंतर विजय वडेट्टीवार यांची विरोधी पक्षनेता म्हणून निवड करण्यात आली. विधानसभेप्रमाणे विधान परिषदेत देखील संख्याबळाच्या आधारे विरोधी पक्षनेते पद पदरात पाडून घेण्यासाठी पक्षातील आमदारांचे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांना पत्र देखील लिहिले आहे.


पत्रावर विधानपरिषदेच्या ९ पैकी ६ आमदारांच्या सह्या आहेत. अभिजित वंजारी, प्रज्ञा सातव, वजाहाद मिर्झा, राजेश राठोड, धीरज लींगडे, सुधाकर अडबाले यांनी सह्या केल्या आहेत. कॉँग्रेसमध्ये सतेज पाटील, राजेश राठोड आणि अभिजीत वंजारी यांची नावे चर्चेत आहे. राज्यातील जातीय समीकरण पाहता विधानसभेत ओबीसी नेते विजय वड्टीवार यांना संधी देण्यात आल्याने विमुक्त जाती भटक्या जमातीला विधान परिषदेत संधी देण्याची मागणी करण्यात आले आहे.

विधानपरिषदेत सध्या कॉँग्रेस पक्षाचे नऊ, राष्ट्रवादी कॉँग्रेस शरद पवार गट चार, राष्ट्रवादी कॉँग्रेसचे अजित पवार गट पाच, शिवसेना उद्धव ठाकरे गट आठ, शिवसेना शिंदे गटाचे तीन जण आहे. विरोधी बाकांवर ज्या पक्षाचं संख्याबळ सर्वाधिक आहे. त्या पक्षाचा विरोधी पक्षनेता बनतो. सध्या कॉँग्रेस पक्ष हाच सर्वाधिक संख्या असलेला विरोधी पक्ष आहे.

विरोधी पक्षनेता हा विरोधी बाकावरच्या सर्व पक्षांचं प्रतिनिधित्व करत असतो. एकूण संख्याबळाच्या एकदशांश तरी संख्या पूर्ण करणारे पक्ष या पदावर दावा करु शकतात अशी अट आहे. त्यात सर्वाधिक संख्याबळ असलेल्या पक्षाला हे पद मिळतं. सध्या विधानपरिषदेचे विरोधी पक्ष नेते पद अंबादास दानवे यांच्याकडे आहे. कॉँग्रेस नेत्यांच्या या मागणी नंतर ठाकरे गट काय भुमिका घेणार याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## प्राचार्य प्रतापराव बोराडे यांचे निधन

मुंबई : ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्राचार्य प्रतापराव बोराडे यांचे दीर्घ आजाराने निधन झाले आहे. आज सकाळी पावणे बारा वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला.



तर औरंगाबादच्या एमजीएम स्टेडियम अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. राष्ट्रवादीचे प्रमुख शरद पवार यांनी देखील ट्वीट करत प्रतापराव बोराडे यांना श्रद्धांजली वाहिली असून, दुःख व्यक्त केले आहे. विशेष म्हणजे प्रताप बोरडे आणि शरद पवार यांचे घनिष्ठ मैत्री होती. छत्रपती संभाजीनगरचा दौरा असला की शरद पवार आणि बोराडे यांची भेट ठरलेली असायची.


ज्येष्ठ समाजवादी विचारवंत, महात्मा गांधी मिशनचे विश्वस्त, विद्या प्रतिष्ठान, बारामतीचे माजी प्रशासकीय अधिकारी, ऋषीतुल्य विद्यार्थीप्रिय व्यक्तिमत्त्व प्राचार्य प्रतापराव बोराडे यांचे छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे आज दुःखद निधन झाल्याची बातमी समजली. मागील पाच दशके प्रतापरावांचा आणि माझा स्नेह होता.जगभरात एखादा देश क्वचितच आढळेल जिथे त्यांचा विद्यार्थी सापडणार नाही.आपल्या ज्ञानदानाने व उत्तम प्रशासकीय कौशल्याने त्यांनी अनेक शैक्षणिक संस्था नावारूपास आणल्या.राज्यातील अनेक परिवर्तनवादी संघटना व संस्था यांच्यासोबत त्यांचा संवाद होता.मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने ते आग्रही होते.आज त्यांच्या निधनाची बातमी ही मला वैयक्तिक वेदनादायी आहे.त्यांच्या कुटुबियांना व एमजीएम परिवाराला या दुःखातून सावरण्याची शक्ती मिळो.


मराठवाड्याच्या शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले होते. मराठवाडा साहित्य परिषदेच्या उभारणीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्यांमध्ये प्राचार्य प्रताप बोराडे यांचे महत्त्वपूर्ण योगदान दिले होते. मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने देण्यात येणारा जीवनगौरव पुरस्काराने त्यांना २०२० साली गौरविण्यात आले होते. बोराडे हे दोन दशकाहून अधिक काळ जवाहरलाल अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य होते. ते अभियांत्रिकीचे दुहेरी पदवीधर होते. त्यांना विविध व्यावसायिक संस्थांशी संपर्क आणि संबंध होता.

# उषा चव्हाण यांची झी टॉकीजला नोटीस; 'या' १३ चित्रपटांवर सांगितला हक्क

मुंबई : सुप्रसिद्ध अभिनेत्री उषा चव्हाण यांनी दादा कोंडके यांच्याबरोबर अनेक गाजलेल्या चित्रपटांमध्ये काम केले आहे. अनेक चित्रपटांची त्यांनी सहनिर्मिती म्हणून सुद्धा काम केले होती. एक कलाकार आणि सहनिर्माती म्हणून उषा चव्हाण यांनी तयार केलेल्या तेरा चित्रपटावर त्यांचा हक्क आहे. या पार्श्वभूमीवर कोणालाही त्यांच्या परवानगीशिवाय हे विकता येणार नाही किंवा ट्रान्सफर करता येणार नाही. या कारणामुळे उषा चव्हाण यांचे सुपुत्र हृदयनाथ देशमुख यांनी दादांचे चित्रपट प्रदर्शित करणाऱ्या झी टॉकीज आणि मध्यस्थ असलेल्या एव्हरेस्ट व्हिडिओ आणि दादांचे नातेवाईक असलेल्या माणिक मोरे आणि पदमाकर मोरे यांना ईमेल पाठवून हक्कभंग झाल्याचे कळवले आहे.

हृदयनाथ देशमुख यांनी पाठवलेल्या ईमेलमध्ये एकूण अकरा जणांना दोषी ठरवले आहे. हृदयनाथ देशमुख यांनी लिहिलेल्या ई-मेलमध्ये असे म्हटले की, उषा चव्हाण आणि दाद कोंडके यांच्या जोडीने अनेक सुपर डुपर हिट चित्रपट दिले आहेत. त्यापैकी तेरा चित्रपटामध्ये उषा चव्हाण यांनी प्रत्येक चित्रपटाच्या अनेक विभागामध्ये काम केलेले आहे. त्यामुळे त्यांना न विचारात झी टॉकीजने तेरा चित्रपटापैकी पाच चित्रपटांच्या जाहिराती डिजिटल प्लॅटफॉर्मवर सुरू केल्या आहेत. हे करणे बेकायदेशीर




आणि कॉपीराईट क्ट २०१२ (सुधारित) अंतर्गत सेक्शन ५०, सेक्शन ६३ ते ७० अंतर्गत अयोग्य आहे. झी टॉकीजने त्यातील 'सासरचे धोतर' या आगामी चित्रपटाची जाहिरात सुरू ठेवली आहे. त्याचबरोबर उषा चव्हाण यांना लाभलेल्या स्वामित्व हक्काचा भंग होत. यामुळे झी टॉकीज आणि दादांचे नातेवाईकांवर गुन्हेगारी आणि फौजदारी असे दोन्ही गुन्हे दाखल होऊ शकतात. हृदयनाथ देशमुख यांनी हा ईमेल झी टॉकीज, सोनी टेलिव्हिजन, पोलीस प्रमुख आणि भाजपा नेते नितीन गडकरी यांना केला आहे.

तेरा चित्रपटांपैकी पाच चित्रपटांची जाहिरात झी टॉकीजवर सुरू असून त्यात प्रामुख्याने, 'सासरचे धोतर', 'राम राम गंगाराम', 'बोट लावीन तिथे गुदगुल्या', 'आली अंगावर', 'पळवा पळवी' या चित्रपटांची नावे आहेत. ज्याकडे त्या चित्रपटांचे स्वामित्व हक्क आहेत. त्यांची परवानगी न घेतल्याने कॉपीराइट कायदा १९५७ (सुधारित) चे उल्लंघन होत असल्याचे देशमुखांचे म्हणणे आहे. त्या खेरीज, प्रमुख अभिनेत्री तसेच सहनिर्माती म्हणून आपली परवानगी न घेता. विकत घेतलेल्या १३ चित्रपटांवर आपला कायदेशीर हक्क असून तो भंग होत असल्याचे उषा चव्हाण यांनी या ई-मेलमध्ये म्हटले आहे. या ईमेलमध्ये उषा चव्हाण यांनी तेरा चित्रपटांची यादी दिली असून त्या सगळ्या चित्रपटांवर आपला कॉपीराईट हक्क असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. वरील पाच चित्रपट वगळता इतर चित्रपटांमध्ये 'सोंगाड्या', 'एकटा जीव सदाशिव', 'पांडू हवालदार', 'तेरे मेरे बीच में', 'गुंगा बच्चा सबसे अच्छा', 'अंधेरी रात मे दिया तेरे हाथ मे', 'मुका घ्या मुका', 'वाजवू का या' चित्रपटांची नावे नमूद केली आहेत.

विशेष म्हणजे दादा कोंडके यांची बहिण लिलाबाई राजाराम मोरे यांचा मुलगा पद्माकर मोरे आणि सुनबाई माणिक राजाराम मोरे यांनी एवरेस्ट व्हिडिओचे मालक संजय छाबरिया यांच्याबरोबर करार करून वरील चित्रपटांच्या प्रती करून घेतल्याचे हृदयनाथ देशमुख सांगतात. जेव्हा मोरे आणि दादा कोंडके ट्रस्ट यांच्यातच १७ चित्रपटांवरून वाद सुरू असताना मोरे हे दादांचे तेरा चित्रपट एव्हरेस्टला कसे विकू शकतात असा प्रश्न ते उपस्थित करतात. संजय छाबरिया यांनी ते चित्रपट पुढे सॅटॅलाइट हक्कासह झी टॉकीजकडे दिले. ही थर्ड पार्टी अग्रीमेंट कॉपीराईटमध्ये बसत नसल्याची माहिती देशमुख दिली आहे. एखाद्या कलाकृतीचा हक्क हा मूळ मालकाच्या मृत्यूनंतर पन्नास वर्ष त्याने ठरवलेल्या किंवा कायद्याने चालून आलेल्या मालकाकडे राहतो. दादांचा पहिल्या चित्रपटाला अजून पन्नास वर्षे पूर्ण झालेले नसल्याने, त्यापैकी कोणतेच चित्रपट पब्लिक डॉमिनवर येऊ शकत नाही आणि यायचेच असल्यास त्यापूर्वी ज्यांच्याकडे त्या चित्रपटाचे हक्क आहेत. चित्रपट पब्लिक डॉमिनवर दाखवण्याची परवानगी घेणे कायद्याने बंधनकारक असल्याचे माहिती ते देतात.

आज हृदयनाथ देशमुख यांनी संबंधितांना ईमेल केले असून पुढे ते उषा चव्हाण यांचा मालकी हक्क, आयपीआर हक्क, गुन्हेगारी हक्क यावर पुण्यामध्ये कायदेशीर पोलीस तक्रार करणार आहेत असे कळवतात. त्यानंतर जर तिढा सुटला नाही तर कोर्टामध्ये दावा दाखल करणार असल्याची माहिती दिली आहे. उषा चव्हाण यांनी आपल्या कारकिर्दीची ३१ वर्ष या सर्व चित्रपटांना दिली आहेत. त्यामुळे त्यांचा हक्क हा प्रत्येक चित्रपटामध्ये अबाधित असून या सगळ्या चित्रपटाचे प्रक्षेपण ताबडतोब थांबवावे अन्यथा संबंधितांना कारवाईला सामोरे जावेल लागेल.

या ईमेलची प्रत हृदयनाथ देशमुख यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच अजित पवार आणि सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांना देखील पाठवली आहे. कॉपीराईट हक्क कायदा हा आपल्या बाजूने असल्याने आपल्याला नक्कीच न्याय मिळेल असा विश्र्वास हृदयनाथ देशमुख व्यक्त करतात.

# ग्राहकहितासाठी टेलिकॉम क्षेत्राला नव्या धोरणाची गरज!

टेलिकॉम क्षेत्रात पुरवठादार कंपन्यांची संख्या जोपर्यंत वाढत नाही, तोपर्यंत या क्षेत्रात तीव्र स्पर्धा निर्माण होणार नाही. स्पर्धाच नसेल तर 'हम करे सो कायदा' असेच धोरण सुरू राहील आणि त्यांनी ठरवलेल्या किमतींमध्येच सर्व सेवा या ग्राहकांना घ्याव्या लागतील. याउलट अनेक कंपन्या या क्षेत्रातील स्पर्धेत असल्यास टेलिकॉम क्षेत्रात अनेक बदल घडतील आणि स्वस्त दरात ग्राहकांना विविध सेवा मिळतील, पण त्यासाठी टेलिकॉम क्षेत्रासाठी नव्या धोरणाची गरज आहे.

विविध क्षेत्रांमध्ये प्रगतीचे नवनवे टप्पे गाठणार्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने सध्या टेलिकॉम क्षेत्रावरही लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे, हे काही वेगळेपणाने सांगायला नको. भारतात सध्या टेलिकॉम क्षेत्रात अस्तित्वात असणार्या कंपन्यांच्या संख्यांची स्थिती पाहता केंद्र सरकारने टेलिकॉम क्षेत्रावर सध्या लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. टेलिकॉम क्षेत्रात केंद्र सरकारने नवे धोरण राबविल्याशिवाय या क्षेत्रातील पुरवठादार कंपन्यांची संख्या वाढणे अशक्यप्राय आहे. जोपर्यंत नवे धोरण लागू होत नाही, तोपर्यंत टेलिकॉम सेक्टर भरारी घेण्याच्या रेंजमध्ये येणे कदापि शक्य नाही.

टेलिकॉम क्षेत्रात पुरवठादार कंपन्यांची संख्या जोपर्यंत वाढत नाही, तोपर्यंत या क्षेत्रात तीव्र स्पर्धा निर्माण होणार नाही. स्पर्धाच नसेल तर 'हम करे सो कायदा' असेच धोरण सुरू राहील आणि त्यांनी ठरवलेल्या किमतींमध्येच सर्व सेवा या ग्राहकांना घ्याव्या लागतील. याउलट अनेक कंपन्या या क्षेत्रातील स्पर्धेत असल्यास टेलिकॉम अनेक बदल घडतील आणि स्वस्त दरात ग्राहकांना विविध सेवा मिळतील, यात काही शंका नाही. म्हणूनच या क्षेत्रातील कंपन्यांची संख्या वाढणे अत्यंत गरजेचे आहे. उदाहरण घ्यायचेच झाल्यास गेल्या काही वर्षांतील मोबाईल सेवा पुरविणार्या कंपन्यांचे घेता येईल.

काही वर्षांपूर्वी मोबाईल सेवा पुरविणार्या कंपन्या या आपल्या ग्राहकांना इनकमिंग कॉलची सुविधा फ्री म्हणजेच मोफत दरात देत होत्या. इतकेच नव्हे, तर अनेक पुरवठादार कंपन्यांनी या योजनेचा प्रचार करताना फ्री लाईफटाईम इनकमिंग सेवा, असा प्रचारही केला होता. या योजनेंतर्गत मोबाईल सेवा पुरवठादार कंपन्यांनी ग्राहकांना इनकमिंग कॉलची सेवा अनेक वर्षांपर्यंत मोफतही दिली होती, मात्र अलीकडे मोबाईलच्या वेगवान इंटरनेटची व्याप्ती वाढली आणि त्यानंतर मोफत इनकमिंग सेवा ग्राहकांना देणे, हे मोबाईल कंपन्यांसाठी डोईजड ठरू लागले.

अनेक कंपन्यांनी लाईफटाईम फ्री इनकमिंग सुविधा देण्याचे आपले वचन तर मोडलेच, याउलट ग्राहकाला आपला मोबाईल नंबर चालू ठेवण्यासाठी अधिकचे पैसैही भरण्यास भाग पाडले. अनेक जण इतर कंपन्यांचे वेगवान इंटरनेट वापरण्यास प्राधान्य देऊ लागले. वेगवान इंटरनेट सेवा पुरविणार्या कंपन्यांनी मोफत व्हाईस कॉलिंग आणि मेसेजिंगची सुविधाही उपलब्ध करून दिली. त्यामुळे बाजारात अस्तित्वात असणार्या अनेक कंपन्यांना याचा मोठा फटका बसला. केवळ आपला जुना नंबर चालू ठेवण्यासाठीच या कंपन्यांच्या सेवेचा लाभ ग्राहक घेऊ लागले.

ज्या कंपन्या मोबाईलमध्ये वेगवान इंटरनेटच्या सेवेसोबतच कॉलिंग आणि मेसेजिंगच्या सेवा स्वस्त दरात आपल्या ग्राहकांना देऊ शकल्या त्या बाजारात तग धरून राहिल्या, मात्र ज्यांना वेगवान मोबाईल इंटरनेट सेवा देणे शक्य झाले नाही त्या कंपन्या केवळ कॉलिंग आणि मेसेजिंगच्या सेवा देत राहिल्या, पण त्या फार यशस्वी होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे त्या कंपन्या बाजारातही तग धरून राहू शकल्या नाहीत, परिणामी कालांतराने एकेक करत या कंपन्या बंद होत गेल्या. जवळपास १५ ते २० कंपन्यांसह कार्यरत असणारे टेलिकॉम क्षेत्र हे अवघ्या ४ कंपन्यांचे क्षेत्र बनले. उरल्या सुरल्या कंपन्याही बंद होण्याची भीती वाटू लागल्यानंतर टेलिकॉम क्षेत्रासाठी नवे धोरण आणण्यात आले.

या धोरणांतर्गत फ्री इनकमिंग कॉल्स आणि मेसेजिंगची सुविधा तर बंद झालीच, मात्र कंपन्या आणखीन तोट्यात जाऊ नयेत यासाठी मोबाईल ग्राहकांना आपला नंबर चालू ठेवण्यासाठी दर महिन्याला ठराविक निश्र्चित रकमेचा भरणा करणे सक्तीचे करण्यात आले. सुरुवातीला ही किंमत २० ते ३० रुपयांच्या घरात होती. त्यानंतर ती वाढवून ४९ इतकी करण्यात आली. कालांतराने ही ७९ आणि त्यानंतर ९९ रुपये करण्यात आली, मात्र त्यानंतरही कंपन्यांचे तोट्यात जाणे सुरूच असल्याने सध्याच्या घडीला महिनाभराचा किमान बॅलेंस हा १७९ रुपयांच्या घरात जाऊन पोहोचला आहे. एकेकाळी किमान रिचार्ज हा १० रुपये इतका होता, परंतु सध्याच्या घडीला तो १७९ रुपयांवर गेला आहे. मोबाईल कंपन्यांनी कमीतकमी १५ रुपयांच्या रिचार्जची सुविधा उपलब्ध करून दिली आहे, मात्र त्याची कालमर्यादा ही केवळ एका दिवसाचीच ठेवली आहे.

त्यामुळे ही सुविधा काही ग्राहकांच्या तितकीशी कामी येत नाही. याआधी १० रुपयांचा किमान रिचार्ज असला तरी त्याची कोणतीही कालमर्यादा नव्हती. तसेच लाईफटाईम फ्री इनकमिंगची सुविधा होती. त्यामुळे मोबाईल वापरणे हे



गरिबांपासून ते श्रीमंतांपर्यंत सर्वांसाठी परवडणार्या दरात होते. आजही मोबाईलचा वापर गरिबांपासून ते श्रीमंतांपर्यंत अनेकांकडून केला जात आहे, परंतु फरक इतकाच केवळ की तेव्हा ते वापरणे हे कमी किमतीचे आणि परवडण्याजोगे होते. आता मात्र पूर्वीच्या तुलनेत ते अधिक महाग आणि महागाईला निमंत्रण देणारे असल्याने अनेकांना पदरमोड करून वापरावे लागत आहे.

भारतीय टेलिकॉम क्षेत्रात सध्या एका हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्याच मोबाईल पुरवठादार कंपन्या कार्यरत आहेत. जिओ, एअरटेल, व्ही आणि बीएसएनएल या अवघ्या ४ कंपन्या सध्या या क्षेत्रात कार्यरत आहेत. मोबाईल ग्राहकांना या कंपन्यांद्वारेच सध्या इंटरनेट आणि कॉलिंग, मेसेजिंग सेवा पुरविण्यात येत आहेत. ज्या कंपन्या कार्यरत आहेत, त्यांपैकीही काही कंपन्या अखेरच्या घटका मोजत आहेत, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्या कधी बंद होतील, हे आता सांगता येणार नसले तरी सध्याची स्थिती पाहता या कंपन्यांचे भवितव्य फारसे चांगले नाही, असेच अनेकांचे म्हणणे आहे. त्यामुळे नवे धोरण आणल्याशिवाय या कंपन्यांना पुनरुज्जीवन मिळणे शक्य नाही. भारतात १९९५ सालापासून मोबाईल सेवेला सुरुवात झाली असली तरी मोबाईल कॉलिंगचा दर हा जवळपास १६ ते १७ रुपये प्रतिकॉल होता.

मोबाईल केवळ श्रीमंतांसाठीच म्हणून ओळखला जायचा. कालांतराने तो ८ ते १० रुपयांवर आला. तरी त्या काळात टेलिफोन सुविधा ही एका रुपयात प्रतिकॉल असल्यामुळे मोबाईल सेवा ही अनेकांसाठी महागडीच ठरत होती. त्यानंतर १९९९ मध्ये या क्षेत्रासाठी तत्कालीन केंद्र सरकारने नवे धोरण लागू केले. एजीआर, सीडीएमए तंत्रज्ञानास मंजुरी मिळाल्यानंतर बीएसएनएल, एमटीएनएल या सरकारी टेलिफोन कंपन्याही मोबाईलच्या स्पर्धेत उतरल्या. मोबाईलच्या किमती आणखी स्वस्त झाल्या. त्यावेळी रिलायन्सने या धोरणाचा फायदा उठवत 'कर लो दुनिया मुट्ठी में' म्हणत सीडीएमए मोबाईल कमी किमतीत आणि एक हजार रुपयांत लाईफटाईम फ्री इनकमिंग सेवा ग्राहकांसाठी उपलब्ध करून देत मोबाईलचा बाजारच उठवला. वायरिंग टेलिफोनऐवजी अनेक भारतीय मोबाईल वापरास प्राधान्य देऊ लागले.

एकेकाळी १६ ते १७ रुपयांचा मोबाईल कॉल हा ०.५० पैशांमध्ये नागरिकांना उपलब्ध होऊ लागला. येथून मोबाईलचीच चलती सुरू झाली. त्यानंतर स्मार्ट फोन्स बाजारात आले. मोबाईलवर इंटरनेट सेवा नागरिकांना उपलब्ध होऊ लागली. २ जी, ३ जी असे मोबाईल इंटरनेटचे वेगवान टप्पे भारताने गाठण्यास सुरुवात केली. थोडक्यात सांगायचे झाले, तर नव्या धोरणाला मंजुरी दिल्यानेच टेलिकॉम क्षेत्राने एकेकाळी २० रुपयांचा महागडा मोबाईल कॉल हा ०.५० रुपयांत आणण्यात यश मिळविले. केवळ मोबाईल कॉल्सबाबतच नाही, तर वेगवान इंटरनेटसह वेळोवेळी प्रगतीचे नवे टप्पे गाठण्यात यश मिळविले. म्हणूनच आजही टेलिकॉम क्षेत्रातील कंपन्यांची संख्या वाढविण्यासाठी नव्या धोरणाची गरज आहे. केंद्र सरकारने याकडे तातडीने लक्ष दिले पाहिजे. अन्यथा कंपन्यांची संख्या आणखी कमी होईल आणि ग्राहकांना महागडी मोबाईल सेवा वापरण्यावाचून पर्याय उरणार नाही.

भारतीय टेलिकॉम क्षेत्राने तंत्रज्ञानाच्या बाबतीत उत्तम प्रगती साधली आहे, यात काही शंका नाही. गेल्या वर्षी आपण ४ जी कडून ५ जी कडे वाटचाल केली. २०३० पासून ६ जी सेवा भारतात सुरू करण्यासाठी सध्या चाचण्या सुरू आहेत. या चाचण्या यशस्वी ठरल्यानंतर कदाचित २०३०च्या आधीपासूनच देशात ६ जी सेवेला सुरुवात होईल. नवे आधुनिक आणि वेगवान तंत्रज्ञान वापरत टेलिकॉम क्षेत्र प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहे हे चांगलेच आहे, परंतु या प्रगतीबरोबरच आपण जर या क्षेत्रातील कंपन्यांच्या संख्या वाढीकडेही लक्ष दिले, तर निश्र्चित याचे अगणित फायदे आहेत. मोबाईल पुरवठादार कंपन्यांची संख्या वाढली, तर रोजगार वाढीसह मदत होईल, हे काही वेगळेपणाने सांगण्याची गरज नाही. कंपन्यांच्या संख्यावाढीमुळे हे क्षेत्र पुन्हा बळकट तर होईलच, तसेच वेगवान इंटरनेट आणि कॉलिंग तसेच मेसेजिंग सेवाही स्वस्त दरात उपलब्ध होतील. यातच ग्राहकांसोबत टेलिकॉम कंपन्या आणि संपूर्ण क्षेत्राचे हित आहे.

# अधिकाचे वाण!

त्या दिवशी पुराणिकबुवांनी धोंड्या म्हणजे पुरुषोत्तम-अधिक मासाची गोष्ट सांगितली होती. त्यांनी सांगितलेली गोष्ट काही मी ऐकली नाही, पण तिथून आलेल्या बायकांना त्या अधिक महिन्यात ३० आणि ३ पदार्थांचे यथाशक्ती दान करायचे असते हे मात्र कळले होते. त्या दिवशी मला खास माहिती देणारी कोना, तिनं मला विचारलं, धोंड्या मासात काही दिलं तौ चालसीन का? कोणाला द्यायचं? मी विचारलं. भटजीबुवाला, तिनं सांगितलं. मी मान उडवली, पण कोना आणि तिच्या मैत्रिणींच्या डोक्यात ३० आणि ३ पदार्थांचे दान करायचं हे पक्कं बसलं होतं. कोनाबाई म्हणजे सगळ्या बायकांची म्होरक्याच होती. अडलेले बाळंतपण असो किंवा साप डसला असो तिच्याकडं औषधे असायची.

एका अधिक महिन्यात मी छत्तीसगडमध्ये रामगढ इथे मोरिया गोंडाच्या संस्कृतीचा अभ्यास करीत होते. मध्य प्रांत आणि उत्तरेतील आदिवासींच्यातले महिने पौर्णिमेपासून सुरू होतात. त्यांना अधिक महिना माहीत नसतो. त्यावेळी खरंतर मलाही अधिक महिना आल्याची काही खबर नव्हती, पण त्या पाड्यात एक मोठं शिवमंदिर होतं. तिथे एक पुराणिकबुवा यायचे. संध्याकाळी बाया आणि बापे कथा ऐकायला तिथे जमायचे. त्याचं आणखी एक कारण म्हणजे पुराणिकबुवांच्या कथा सांगून झाल्यावर त्यांचा एक शिष्य पोहे, लाह्या, डाळ, काकडीच्या फोडी, पेरू, केळी, लिंबाचं लोणचं, थोडे दही, दूध घालून भरपूर गोपाळकाला तयार करायचा. पुराण संपेपर्यंत तो शिष्य मोहाच्या पानांचे मोठाले द्रोण करायचा आणि मोठ्या द्रोणातून तो गोपाळकाला जमलेल्या प्रत्येकाला द्यायचा. मलाही तो गोपाळकाला खायला फार आवडायचे. त्यामुळे मीही अधूनमधून पुराण संपल्यावर तिथे जाऊन यायचे.


त्या दिवशी पुराणिकबुवांनी धोंड्या म्हणजे पुरुषोत्तम-अधिक मासाची गोष्ट सांगितली होती. त्यांनी सांगितलेली गोष्ट काही मी ऐकली नाही, पण तिथून आलेल्या बायकांना त्या अधिक महिन्यात ३० आणि ३ पदार्थांचे यथाशक्ती दान करायचे असते हे मात्र कळले होते.

त्या दिवशी मला खास माहिती देणारी कोना, तिनं मला विचारलं, धोंड्या मासात काही दिलं तौ चालसीन का?

कोणाला द्यायचं? मी विचारले भटजीबुवाला तिनं सांगितलं.

मी मान उडवली, पण कोना आणि तिच्या मैत्रिणींच्या डोक्यात ३० आणि ३ पदार्थांचे दान करायचं हे पक्कं बसलं होतं.

कोनाबाई म्हणजे सगळ्या बायकांची म्होरक्याच होती. अडलेले बाळंतपण असो किंवा साप डसला असो तिच्याकडं औषधे असायची. त्याशिवाय कधी दूधमोगीचा (तिथली देवी) तर कधी सूर्या देव तर कधी शंभू महादेव यांचा कोप झाला असेल तर तेही तिला माहीत असायचे. त्यावरचे उपायही तिलाच माहिती असायचे. तिथल्या डुकर्या भगताशी तिचे मुळीच पटायचे नाही. कारण तो काही झालं तरी



उठसूठ कोंबडं कापायला सांगायचा. ते आमच्या कोनाबाईला मुळीच पटायचे नाही. बोरं, कंदमुळं किंवा मोहाची फुलं घातली तरी देवतांचा कोप जातो, असे कोनाबाईचे म्हणणे असायचे,

पण दर तीन-चार महिन्यांनी महादेव मंदिरात येणार्या पुराणिकबुवांबद्दल तिला मोठी भक्ती वाटायची. त्यांचे एक पुराणही ती चुकवत नसे.

ते पुराणिक बुवा प्रत्येक वेळी साधारण आठवडाभर पुराण सांगत. आठवड्याच्या शेवटी तिथले सर्वजण मिळून त्यांना जेवायला घालत. जेवण साधेच असे. भात, डाळीचं तिखट वरण, कसली तरी पालाभाजी आणि कुटकीचे गोड लाडू. त्याचबरोबर कोणी कोणी मध, धान, शिंगाडे, बोरं, कवठ, औषधी मुळ्या हेही त्यांना देत असत, पण यावेळी तिथे अधिक महिना असल्याची गोष्ट सांगितली होती. त्या महिन्यात काही दान केलं पाहिजे हे कोनाबाईच्या डोक्यात पक्कं ठसलं होतं. ते तिनं इतर बायांच्याही गळी उतरवलं होतं.

मी तर म्हटलं, पुराणिकबुवांना जेवायला घालून त्यांना काय काय देता, ते दानच अजून काय दान द्यायचं?

त्यावर नेहमी देतो त्यापेक्षा जास्त द्यायचं असतं तरच नारायण देवाचीही कृपा होईल, असं कोनाबाईचं म्हणणं पडलं.

पुराणिक बुवांना ३० आणि ३ असंच दान दिलं पाहिजे असं तिचं म्हणणं होतं.

३० आणि ३ नाणी द्यावी का, असा विचार झाला, पण पुराणिकबुवा पैसे घेत नसत. कोणी पैसे दिले तरी जाताना ते तिथल्या सरपंचाच्या हाती पैसे देऊन जात. मग काय कुटकीचे लाडू द्यावे का, असाही विचार झाला, पण पुराणिक बुवांचे दात तितकेसे चांगले नव्हते. ते एखादा लाडू कसाबसा खात. एवढे लाडू दिल्यावर त्यांचे सगळेच दात पडले असते. त्यामुळे कुटकीचे लाडूही बाद झाले. शेवटी सर्वानुमते खडीसाखरेचे ३० आणि ३ खडे द्यायचे ठरले.

अजून काहीतरी वस्तूही भेट म्हणून देतात, मी उगीचंच म्हटले. अर्थातच मी नंतर सारवासारव केली तरी एकदा म्हटलेलं तेही त्यांच्या डोक्यात पक्कं बसलंच.

त्यानंतर दोन-तीन दिवसांनी पुराणिकबुवांचं त्यावेळचं शेवटचं पुराण होतं. शेवटच्या दिवशी महादेव मंदिरात पुराण झाल्यावर गावजेवण होतं. संध्याकाळपासूनच भात आमटी रांधली होती. खीर केली होती.

देवळाचा परिसर स्वच्छ केला होता. पांढर्या आणि पिवळसर कुंतीच्या फुलांनी महादेवाची पूजा बांधली होती. नंदीलाही माळा घातल्या होत्या. जेवायला पत्रावळी मांडलेल्या होत्या. जेवणाअगोदर पुराणिकबुवांना एका कठड्यावर घोंगडी घालून बसवलं. त्यांच्या गळयात रानगुलाबाची माळ घातली. मोहाच्या पानांच्या पत्रावळीवर खडीसाखरेचे खडे मांडले. त्यांच्यासमोर खापराच्या दिवल्यात करंजीचे तेल घालून दिवे ठेवले. तिथला भुर्या कुंभार खापराच्या एकावर एक अशा इतक्या सुंदर पणत्या बनवायचा की बस! त्यात एकावेळी दहा वाती लावता यायच्या. त्या पणत्यांना जोडून एका साखळीने तो दिवा अडकवताही यायचा. त्यानंतर सरपंच भुल्याने ३० आणि ३ कापडाच्या तुकड्यांची लाल गोंडे लावलेली शाल पुराणिकबुवांच्या अंगावर घातली.

ती शाल इतकी सुंदर विणलेली होती की पाहत राहावी. रायपूरच्या एका ठेकेदाराकडून तिथल्या शिंप्याच्या दुकानातले तुकडे आणि गोंडे मागवले होते. त्या तुकड्यांवर आरसे आणि भरतकाम केले होते. मग ते सगळे तुकडे मोठ्या लाल आणि पांढर्या जाड दोर्यांनी विरळपणे एकमेकांना जोडून जाळीदार शाल विणलेली होती. हे सगळं अक्षरशः दोन दिवसांतच पूर्ण केलं होतं. पुराणिकबुवांना आश्र्चर्यच वाटले. आनंदही अर्थातच झाला.

कोनाबाईनं सांगितलं, ती शाल, खडीसाखर आणि दिवा म्हणजे धोंड्याचं वाण आहे.

पुराणिकबुवांना जरा लाजल्यासारखं झालं.

त्याची काही गरज नव्हती हो कोनाबाई, पुराणिकबुवा म्हणाले.

नाही कसं, नारायण विष्णूचा आशीरवाद आम्हाला पण हवाच की! भुल्या सरपंच म्हणाला.

हे सगळं मला आता आठवायचं कारण म्हणजे सध्याही अधिक महिना सुरू आहे. माझ्या ओळखीच्या एका घरी जावयाला बोलावून सासूबाईंनी चांदीच्या ताटात ३० आणि ३ अनारसे, २ चांदीची निरांजने दिली. आमच्यासारख्या बर्याच मित्रमंडळींना जेवायला बोलावून दणक्यात अधिक महिना साजरा केला.

मला त्यावेळी रामगढच्या त्या अधिक महिन्याची आठवण झाली. आपल्याकडे जावयाला दान देण्यामागे आपल्या मुलीचा आनंद पाहिला जातो, पण कुणीतरी सांगितले म्हणून का असेना पण आपल्याजवळ देण्यासारखे जे आहे ते दुसर्याला द्यावे यामागे कोणती प्रेरणा असेल. देवाने निर्माण केलेल्या माणसांमधल्या अनेक चांगल्या गोष्टींपैकी ती सर्वात सुंदर गोष्ट आहे. त्यासाठी अनेक निमित्तही असतात. त्यातला एक म्हणजे हा अधिक महिना. आपल्याकडे थोडे अधिक यावे आणि जे अधिक असेल ते दुसर्यांनाही देऊन त्यांचाही आनंद द्विगुणित करावा तसे ते वाण! एकमेकांना द्यावे, घ्यावे.

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशीत केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770

# आरोग्य

# साखर सोडल्यावर शरीरात काय परिणाम होतात?

तुम्हाला हे वाचून आश्र्चर्य वाटेल मात्र गेल्या दहा वर्षांपासून विकसित देशात साखर खाणं कमी केलं आहे. याची अनेक कारणं आहे.

उदा. चवीत आणि दिनचर्येत बदल. गेल्या दहा वर्षात कार्बोहायड्रेट्स कमी असलेल्या आहाराकडे लोकांचा कल वाढला आहे. किटो इत्यादी डाएट प्रकाराला लोकांनी पसंती दिली आहे. तसंच अति प्रमाणात साखर खाण्याचा धोकाही लोकांना कळला आहे.

साखर कमी करण्याचे किंवा कमी गोड खाण्याचे फायदे आहेतच. कमी साखर खाल्याने शरीरात कमी कॅलरीज जातात, त्यामुळे वजन कमी व्हायला मदत होते, दातांचं आरोग्य सुधारतं. मात्र कमी गोड खाल्ल्याने मूड स्विंग, डोकेदुखी, हे तोटे आहेत. हे तोटे थोड्या काळासाठी असतात. याची कारणं अद्यापही ठाऊक नाही. गोड पदार्थ समोर आल्यावरची ही प्रतिक्रिया असावी असा अंदाज आहे.

कार्बोहायड्रेट्स साखरेसह वेगवेगळ्या पदार्थात असतात. तसंच अनेक फळांमध्ये आणि दुधातही असतात. आपण रोजच्या जेवणात जी साखर खातो ती उसात, बीट आणि मॅपल सिरपमध्ये असते. तर मधात ग्लुकोज आणि फ्रुक्टोज हे घटक असतात.

हल्ली कोणत्याही पदार्थाचं मोठ्या प्रमाणात उत्पादन होतं. अनेक पदार्थ आकर्षक दिसण्यासाठी त्यात वेगवेगळ्या प्रकारची साखर घालतात. त्यामुळे पदार्थाची चव तर छान लागतेच पण त्याचबरोबर साखरेचे मेंदूवरही तितकेच परिणाम होतात. हा परिणाम इतका मोठा असतो की साखरेचं व्यसन लागू शकतं. अर्थात हा दावा अजूनही तपासून पाहिला जात आहे.

सुक्रोज या साखरेतील घटकामुळे जीभेवरील गोड चवीचे रिसेप्टर कार्यान्वित होतात. त्यामुळे मेंदूत डोपामाईन नावाचं रसायन मेंदूत तयार होतं. या रसायनामुळे मेंदूत आनंद लहरी तयार होतात. म्हणून काहीतरी छान खायची इच्छा होते. विशेषत: चमचमीत खाणं. डोपामाईनला ठशुरीव लहशाळलरश्र असंही म्हणतात. ठशुरीव म्हणजे बक्षीस. याचाच अर्थ असा की डोपामाईन मेंदूत तयार झालं की स्वत:ला काहीतरी बक्षीस देण्याची इच्छा होते आणि बऱ्याचदा हे बक्षीस साखरेच्या रुपात मिळावं असं वाटतं.

हे सगळं कसं होतं याबद्दल माणसं आणि प्राणी यांच्यावर संशोधन करण्यात आलं आहे.

अति गोड पदार्थांमध्ये तर स्वत:ला बक्षिस देण्याची क्षमता कोकेनपेक्षा जास्त असते. गोड पदार्थांची चव जिभेवर तरळली किंवा इंजेक्शनवाटे दिली तरी



बक्षीस देण्याची उर्मी जागी होते असं उंदरांवर केलेल्या अभ्यासात समोर आलं आहे. त्यामुळे गोडवा कितीही असला तरी परिणाम एकच असतो हे सिद्ध झालं आहे. सुक्रोझ घेतल्याने डोपामाईन मुळे मेंदूच्या रचनेवर परिणाम होतात. तसंच प्राणी आणि मनुष्यप्राण्यांमध्ये भावनिक बदल होतात.

साखरेचा आपल्यावर परिणाम होतो हे अगदी स्वाभाविक आहे. त्यामुळे साखर न खाल्ल्यामुळे शरीरावर त्याचे परिणाम होतातच. साखर सोडल्यावर मानसिक आणि शारीरिक लक्षणं लगेच दिसायला सुरुवात होते. त्यात डिप्रेशन, काळजी, वारंवार काहीतरी खाण्याची इच्छा, मेंदूत थकवा, डोकेदुखी, झोप येणे या लक्षणांचा समावेश आहे. याचाच अर्थ साखर सोडली की प्रसन्न वाटत नाही. म्हणून या बदलाशी जुळवून घेणं अनेकांना अवघड जातं.

या लक्षणांचा अद्याप सखोल अभ्यास झालेला नाही. मात्र त्यांचा संबंध बक्षिस देण्याच्या व्यवस्थेशी असावा असा कयास आहे. साखरेचं व्यसन हा वादग्रस्त मुद्दा असला तरी साखरेमुळे स्वत:वर ताबा न राहता सतत खायची इच्छा होते. तसंच एखादं व्यसन सोडल्यानंतर जी लक्षणं दिसतात ती दिसायला सुरुवात होते. नंतर पुन्हा साखरेचं व्यसनही लागू शकतं. हा सगळा परिणाम अंमली पदार्थांसारखाच आहे. मात्र हे सगळं प्राण्यांमध्ये दिसलं आहे. त्यामुळे माणसांवर हेच परिणाम होतात का हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही.

बक्षीस देण्याची उर्मी ही प्रक्रिया माणसाच्या उत्क्रांतीनंतरही कायम राहिली आहे. इतर प्राण्यांच्या मेंदूतही अशीच प्रक्रिया होत असते. त्यामुळे साखर सोडल्यावर जे परिणाम प्राण्यांमध्ये दिसतात तेच परिणाम मनुष्यप्राण्यांमध्ये पहायला मिळण्याची दाट शक्यता आहे.

अन्नातून साखर काढली तर डोपामाईनच्या परिणामांमध्ये वेगाने घट होते. त्यामुळे मेंदूच्या कामावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

मेंदूच्या बदललेल्या रासायनिक रचनेमुळे साखर सोडल्यावर किंवा कमी केल्यावर त्याची लक्षणं दिसू लागतात. बक्षीस प्रक्रियेत डोपामाईनचा सहभाग असतोच पण त्याचबरोबर हार्मोन्सवर नियंत्रण ठेवण्यातही डोपामाईनचा सहभाग असतो. म्हणून ओकाऱ्या, चिंता, नॉशिया अशा प्रकारची लक्षणं आढळतात. रोजच्या जेवण्यातून साखर वगळल्यावर मेंदूच्या कार्यरचनेत फरक पडतो त्यामुळे अनेक लोकांना ही लक्षणं ठळकपणे जाणवतात.

साखर सोडल्यावरची लक्षणं मनुष्यप्राण्यांत कमी प्रमाणात आढळतात. तरीही पौगंडावस्थेतील लठ्ठ मुलांमध्ये साखर सोडल्यावर ती अधिकाधिक खाण्याची उर्मी आढळल्याचं एका संशोधनात सिद्ध झालं आहे.

आहारात कोणताही बदल केल्यावर तो काटेकोरपणे पाळणं महत्त्वाचं असतं. जर तुम्हाला साखर सोडायची असेल तर पहिले काही आठवडे फारच कठीण असतात.मात्र साखर तितकीही वाईट नाही हेही तितकंच खरं आहे. मात्र संतुलित आहार आणि योग्य व्यायामाची जोड दिली तर साखर सोडायची पाळी येणार नाही. शेवटी 'थोडक्यात गोडी' असते असं म्हणतात ते उगाच नाही.



# यूरिनरी ट्रॅक्ट इन्फेक्शन, कारणे, लक्षणे आणि उपचार

यूरिनरी ट्रॅक्ट इन्फेक्शन म्हणजे यूटीआय हे कोणाला देखील होऊ शकत.नवजात आणि ५ ते ६ वयोगटाच्या मुलांना देखील याचा धोका होऊ शकतो.पण हा आजार सर्वाधिक महिलांना होतो.पावसाळयात हा त्रास सर्वाधिक उद्भवतो. हवामानाच्या आद्रतेमुळे संसर्गाचा धोका जास्त असतो.हा धोका योनी क्षेत्रात अधिक असतो.या बद्दलची माहिती महिलांना असणं आवश्यक आहे. चला तर मग यूटीआय ची लक्षणे,कारणे,आणि उपचाराची माहिती जाणून घेऊ या.

**यूटीआय म्हणजे काय?**

हा आजार जगातील सुमारे ७० टक्के स्त्रियांना कधी न कधी अवश्य होतो.स्वच्छतेची काळजी न घेतल्यास हा त्रास वाढतो.या आजाराचे मुख्य कारण आहे लघवी ला रोखणे.असं केल्याने संसर्ग आतल्याआतच किडनीत पसरतो. तसेच कमोडच्या घाणेरड्या टॉयलेट सीट वर बसणे.या मुळे कोणत्याही वयोगटातील महिलांना इन्फेक्शन होऊ शकतो.

**यूटीआय ची लक्षणे–**

यूरीन किंवा लघवी करताना जळजळ होणं.याचे आणखी एक प्रमुख कारण आहे शरीरात पाण्याची कमतरता असणं.

यूरीन करताना तीव्र टोचणे आणि जळजळ होणं. यूटीआय चे प्रमुख कारण यूरीनसाठी जोरात दाब बनतो आणि काहीच थेंबा यूरीन येत. गढूळ रंगाची यूरीन होते. रुग्णाला जास्त थकवा, अशक्तपणा, थंडी वाजून ताप येतो.

**उपचार–**

१. पाणी भरपूर प्यावं – पाण्याचा कमतरतेमुळे अनेक आजार होतात.या साठी पाणी भरपूर प्यावे जेणे करून आपण निरोगी राहाल.

२. क्रेनबेरीचा रस प्यायल्यानं यूटीआयच्या संसर्गापासून आराम मिळेल आणि जळजळ देखील कमी होईल.

३. नारळाच्या पाण्याचे सेवन करणे फायदेशीर आहे.नारळाचं पाणी पोटाची जळजळ,पाण्याची कमतरतेला पूर्ण करत.

४. लसणात अँटीफंगल आणि अँटीबॅक्टेरियल गुणधर्म आढळतात.याचा सेवनाने संसर्गात आराम मिळेल.लसणाची तासीर उष्ण असते.डॉक्टरांचा सल्ला घेऊनच याचे सेवन करावे.

५. धणेपूड ची प्रकृती थंड असते.आपण दररोज दूधात धणेपूड मिसळून उकळवून घ्या आणि दररोज १ ग्लास प्यावं.या व्यतिरिक्त धणे आणि आवळापूड समप्रमाणात रात्री भिजत घाला आणि सकाळी हे पाणी गाळून पिऊन घ्या.लगेचच आराम मिळेल.

# नियमित अक्रोडाचे सेवन केल्याने मृत्यूचा धोका कमी होतो, असे अभ्यासातून समोर आले आहे



जे नियमितपणे अक्रोड खातात ते अक्रोड न खाणाऱ्यांपेक्षा जास्त काळ जगतात. अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठाने हार्वर्डच्या नेतृत्वाखाली केलेल्या अभ्यासातून असे स्पष्ट झाले आहे की अक्रोडामध्ये दीर्घ आयुष्य गुणधर्म असतात. अक्रोड देखील अचानक मृत्यूचा धोका कमी करते आणि आयुर्मान वाढवते. न्यूट्रिएंट्स जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या अहवालात असे म्हटले आहे की आठवड्यातून पाच किंवा अधिक अक्रोड खाल्ल्याने शरीराला खूप फायदा होतो. यामुळे अचानक मृत्यूचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होतो आणि आयुर्मान वाढते.

**आरोग्यही चांगले राहते**

हार्वर्ड संशोधन शास्त्रज्ञ यानपिंग ली यांनी सांगितले की, या अभ्यासात आढळलेली सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्यांचे खान–पान सुरुवातीला चांगले नव्हते पण त्यांनी आठवड्यातून एक किंवा दोन अक्रोड देखील खाल्ले त्यामुळे त्यांचे आयुर्मानही वाढले. म्हणजे, सुरुवातीच्या वाईट खाण्याच्या सवयी असूनही तुम्हाला तुमचे आरोग्य सुधारायचे असेल तर अक्रोड खा. ली यांनी म्हटले आहे की जे आता त्यांच्या स्वतःच्या आरोग्याबद्दल जागरूक आहेत त्यांच्यासाठी निरोगी जगण्याचा एक मार्ग असू शकतो. जर त्यांनी त्यांच्या आहारात अक्रोडचा समावेश केला तर त्यांचे एकूण आरोग्य नक्कीच सुधारेल.

अभ्यासात असे दिसून आले आहे की आठवड्यातून पाच किंवा अधिक अक्रोड खाल्ल्याने अचानक मृत्यूचा धोका १४ टक्क्यांनी कमी होतो. यासह, हृदयाशी संबंधित रोगांमुळे मरण्याचा धोका २५ टक्क्यांनी कमी होतो आणि आयुर्मान १.३ वर्षांनी वाढते. आठवड्यातून दोन ते चार अक्रोड खाल्ले तरी मृत्यूचा धोका १३ टक्क्यांनी कमी होतो आणि हृदयाशी संबंधित आजारांमुळे मृत्यूचा धोका १४ टक्क्यांनी कमी होतो. या परिस्थितीतही, आयुर्मान सुमारे एक वर्षाने वाढते.

या संशोधनात संशोधकांनी ६७,०१४ महिला आणि २६,३२६ पुरुषांचा समावेश केला. संशोधनात सहभागी महिलांचे सरासरी वय ६३.६ वर्षे होते तर पुरुषांचे सरासरी वय ६३.३ वर्षे होते. १९८६ पासून या लोकांच्या आरोग्य डेटावर विश्र्लेषण केले गेले. संशोधनात सहभागी असलेले बहुतेक लोक सुरुवातीच्या दिवसांत निरोगी होते. दर चार वर्षांनी त्यांचा अन्न सेवन डेटा बनवला जातो. २० वर्षांच्या संशोधनाच्या शेवटी, असे आढळून आले की अक्रोड हे आयुर्मान आणि हृदयरोगामुळे मृत्यूशी संबंधित होते. ज्या लोकांच्या आहारात अक्रोडाचा अधिक समावेश होता, त्या लोकांमध्ये अचानक मृत्यू, हृदयरोगामुळे मृत्यूची प्रकरणे कमी होती. त्याच वेळी, या लोकांच्या आयुर्मानात आश्चर्यकारक वाढ झाली.

# ड्राय स्कीन High blood sugar चे लक्षण तर नाही

मधुमेह हा असाध्य रोग आहे. हे औषधांच्या मदतीने नियंत्रित केले जाऊ शकते परंतु पूर्णपणे काढून टाकणे शक्य नसतं. मधुमेहाशी संबंधित इतर आजार आहेत जसे कि किडनीची समस्या, डोळ्यांशी संबंधित रोग, हृदयावर परिणाम होणे.

मधुमेहाचा शरीराच्या कोणत्याही भागावर परिणाम होऊ शकतो. पण आम्ही तुम्हाला सांगू की मधुमेहाचा अंदाज चेहऱ्याकडे पाहूनही करता येतो. त्याची लक्षणे काय आहेत हे जाणून घेणे फार महत्वाचे आहे. तर जाणून घेऊया उच्च रक्तातील साखरेची लक्षणे त्वचा पाहून कशी ओळखावी –

डार्क पॅचेस– जर आपल्या शरीरावर हात, मान किंवा इतर ठिकाणी गडद डाग दिसत असतील तसेच, स्पर्श केल्यावर



जर मखमलीसारखे वाटत असेल तर ते उच्च रक्तातील साखरेचे लक्षण आहे. वैद्यकीय भाषेत याला अँकॅन्थोसिस निग्रीकॅन्स म्हणतात. रक्तात इन्सुलिनचे प्रमाण जास्त असताना हे बदल होतात. सुमारे ७५ टक्के मधुमेही रुग्णांमध्ये हे लक्षण दिसून येते.

त्वचेवर डाग – चेहऱ्यावर डाग येणे सामान्य आहे. परंतु जर तुम्हाला त्वचेवर सतत खाज सुटणे, वेदना किंवा वाढलेले मुरुम दिसत असतील आणि जर त्याचा रंग तपकिरी, लाल किंवा पिवळ्या रंगात दिसला तर ते मधुमेहापूर्वीचे लक्षण आहे. याला नेक्रोबायोसिस लिपोडिका म्हणतात. यासाठी, शक्य तितक्या लवकर आपल्या मधुमेह आणि त्वचा काळजी डॉक्टरांशी संपर्क साधा.

त्वचेत कोरडेपणा – वास्तविक, रक्तातील साखरेमुळे शरीरातील रक्ताचा प्रवाह मंद होतो. ज्यामुळे पांढऱ्या रक्त पेशी संसर्गाशी लढण्यास असमर्थ असतात. अशावेळी त्वचेतील कोरडेपणा वाढतो. आणि कालांतराने ते कोरडे होते.

अशा प्रकारे, रक्तातील साखरेचा त्वचेवरही परिणाम होतो. वरीलपैकी कोणतीही लक्षणे दिसल्यास ताबडतोब तुमच्या डॉक्टरांशी संपर्क साधा. जेणेकरून आपण वेळेत या आजाराशी लढू शकतो.

# या ५ गोष्टी पुन्हा पुन्हा खाण्याची सवय आपल्या शरीरात पोषणाची कमतरता असल्याचे दर्शवते

निरोगी जीवन जगण्यासाठी जीवनशैलीत बरेच बदल करावे लागतात. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे अन्न कसे आहे. कारण असं म्हणतात की, आपण जसे खातो तसा विचार करतो.कधीकधी काही लोक नेहमी असा दावा करतात की ते यापुढे फास्ट फूड खाणार नाहीत.पण काही दिवस निघून गेल्यावर त्यांना फास्ट फूड खावेसे वाटते.तज्ज्ञांच्या मते, शरीरात जीवनसत्वे, खनिजे किंवा इतर पोषक घटकांच्या कमतरतेमुळे ही लालसा सुरू होते.अशा ५ गोष्टी आहेत ज्या आपल्याला पुन्हा पुन्हा खावेसे वाटतात.कोणत्या घटकाच्या कमतरतेमुळे ते पदार्थ खाण्याची इच्छा होते?जाणून घ्या.

१. चॉकलेट खाण्याची लालसा –बऱ्याचदा असे दिसून येते की काही लोक चॉकलेटचे वेडे असतात. ते कधीही चॉकलेट खातात. चॉकलेटची इच्छा शरीरात मॅग्नेशियमची कमतरता दर्शवते.मॅग्नेशियमची कमतरता पूर्ण करण्यासाठी पीनट बटर खाऊ शकता. याशिवाय केळी, टोफू, एवोकॅडो हे देखील मॅग्नेशियमचे चांगले स्रोत आहेत.



२. चिप्स खाण्याची इच्छा होणं – जंक फूड प्रेमींना अनेकदा चिप्स खायला आवडतात.जेव्हा त्यांना भूक लागते तेव्हा ते बाजारातून चिप्सचे पॅकेट खाऊन पोट भरतात.पण चिप्स खाण्याची सवय शरीरात सोडियमची कमतरता दर्शवते. शरीरात सोडियमचा पुरवठा करण्यासाठी,आहारात अधिक फळे आणि भाज्यांचे सेवन केले पाहिजे. दुधी, कोथिंबीर, काकडी, कोबी यांचे सेवन केल्याने सोडियम ची कमतरता पूर्ण होते .

३. कॉफी पिण्याची इच्छा होणं – काही लोकांना कॉफीची खूप आवड असते.ते दिवसातून सुमारे ५ वेळा कॉफी पितात.शरीराला कॅफीनची गरज असते,पण जास्त प्रमाणात कॉफी पिणे हानिकारक होऊ शकते.कॉफीची वारंवार इच्छा म्हणजे शरीराला कॅफीनची गरज असणे आहे. कॉफी ऐवजी,आपण रात्री गरम काढा देखील पिऊ शकता.ज्यामुळेआपली कॅफिन पिण्याची इच्छा देखील शांत होईल.यासह,रोगप्रतिकारक शक्ती देखील मजबूत होईल.

४. कोल्ड ड्रिंक्स पिण्याची इच्छा होणे –कॅफिनची कमतरता असल्यावर ही शरीराला नुकसान देते. जर आपल्याला कोल्ड ड्रिंक्स पिण्याची इच्छा असेल तर याचा अर्थ कॅफीनची कमतरता असणे.हे या ठिकाणी शीतपेयांचा सेवन करणे देखील योग्य नाही.अशा परिस्थितीत आपण हर्बल चहा पिऊ शकता, बर्फाचा चहा पिऊ शकता.ज्यामुळे आपली कोल्ड्रिंक्स पिण्याची लालसाही कमी होईल.कॅफीनच्या कमतरतेमुळे शरीरातील सेरोटोनिनची पातळीही कमी होते.ज्यामुळे व्यक्ती चिडचिडी होते,एकाग्रता होण्यास असमर्थ होते.या सारख्या समस्या होऊ लागतात.

५. चीझ खाण्याची इच्छा – जंक फूडमध्ये प्रत्येक गोष्ट चीझ ने सजलेली असते. पण जेव्हा चीझ पोटात साचत तेव्हा त्याचे अनेक दुष्परिणाम होतात. विशेषतः मुलींसाठी चीझ हानिकारक आहे.चीझ ची भूक शमवण्यासाठी,दह्याचे सेवन केले पाहिजे.खरं तर,चीझ मध्ये कॅल्शियम,सॅच्युरेटेड फॅट आणि मॅग्नेशियम मुबलक प्रमाणातआढळतात.

# मजबूत केसांसाठी शाकाहारी आहार या ५ भाज्या पावसाळ्यात केस मजबूत करतील

केस जितके घनदाट आणि काळे असतील तेवढेच सौंदर्य वाढते. सध्याच्या ,धावपळीच्या जीवनात केसांची काळजी घेणे देखील आवश्यक आहे.अन्यथा,आवश्यक पोषणाच्या अभावामुळे केस गळणे आणि पडणे सुरू होत. कालांतराने,ते निर्जीव आणि रुक्ष देखील होतात.लोक केसांसाठी उपचार देखील घेतात,परंतु आपला आहार आणि आहारामध्ये आवश्यक आहाराचा समावेश करून केसांची काळजी घेता येते.पावसाळ्यात केसांची अधिक काळजी घ्यावी लागते कारण ओलावामुळे केस लवकर तुटतात. चला तर मग जाणून घेऊया केसांसाठी कोणत्या गोष्टींचा आहारात समावेश करावा.

हिरव्या भाज्या – आपल्या आहारात हिरव्या भाज्यांचा समावेश करा.यामुळे केसांना आयरन मिळेल.दुधीचा रस सकाळी प्यालाच पाहिजे.यामुळे केस गळणार नाहीत.पालक आणि ब्रोकोली आवर्जून खा.

आवळा – आवळ्याचा रस, मुरंबा खाणे आणि पिणे खूप फायदेशीर आहे.केसांबरोबरच डोळेही आवळ्याच्या रसाच्या सेवन मुळे





चांगले होतात.त्यात असलेले व्हिटॅमिन सी केसांसाठी चांगले असते.यामुळे केस गळणे कमी होते, केसांना आवश्यक पोषण मिळते.आवळा वेगवेगळ्या प्रकारे खाऊ शकतो.

कांदा – कांद्याचा रस आजकाल खूप ट्रेंडमध्ये आहे.कांद्यामध्ये बॅक्टेरियाविरोधी गुणधर्मांअसल्या मुळे केस गळणे कमी होते.हे डोक्यातील कोंडा आणि संसर्ग दूर करण्यासाठी देखील खूप उपयुक्त आहे.कांद्याचा रस डोक्याला १ तास लावून ठेवा आणि त्यानंतर डोके धुवा.फरक ३ महिन्यांत दिसून येईल.

एवोकॅडो – या फळांमध्ये भरपूर पोषण असतं.हे डोक्यावर लावल्याने आवश्यक घटक मिळतात.या मध्ये नैसर्गिक तेल आढळते.जे केसांमध्ये लावल्याने रुक्षपणा संपतो,केस चमकदार होतात,पूर्ण पोषणासाठी अ‍ॅव्होकॅडो हेअर मास्क देखील लावू शकतात.यासाठी,एक एवोकॅडो मॅश करा आणि त्यात २ चमचे नारळ तेल किंवा ऑलिव्ह ऑईल मिसळा.यानंतर, डोके धुण्यापूर्वी ४५ मिनिटांपूर्वी ते लावा.यामुळे केस मऊ आणि चमकदार होतील.

गाजर – गाजर केवळ दृष्टी वाढवण्यासाठीच चांगले नाही तर केसांसाठी देखील खूप चांगले आहे.त्यात असलेले व्हिटॅमिन ई केस काळे,घनदाट आणि लांब

करते.त्यात असलेले व्हिटॅमिन सी स्कॅल्प मध्ये रक्त परिसंचरण सुधारते. ज्यामुळे केस जास्त काळे होत नाहीत.

## जागतिक आदिवासी दिन होणार साजरा

लातूर : संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्वसाधारण आमसभेच्या ठरावानुसार ९ ऑगस्ट हा दिवस 'जागतिक आदिवासी दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. त्यानुसार आदिवासी विकास विभागाच्या अधिपत्याखाली कार्यालय, आश्रमशाळा, वसतिगृह, महाविद्यालय इत्यादी ठिकाणी ९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यात येणार असल्याचे औरंगाबाद एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पचे प्रकल्प अधिकारी यांनी कळविले आहे. औरंबाद एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अंतर्गत औरंगाबाद, लातूर, जालना व बीड या जिल्ह्यांचा समावेश असून ९ ऑगस्ट रोजी 'जागतिक आदिवासी दिन'निमित्त कन्नड (जि. औरंगाबाद) येथील गौताळा रोडवरील डीडीएल लॉन्स येथे कार्यक्रम नियोजित आहे. या कार्यक्रमाला औरंगाबाद, लातूर, जालना व बीड या चारही जिल्ह्यातील सर्व आदिवासी बंधू व भगिनींनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


लातूर

# भूकंप

http://epaper.dainikbhukamp.com


## लातूर परिमंडळ अध्यक्षपदी अजय गुळवे यांची निवड

लातूर : राज्यात विद्युत क्षेत्रीतील अधिकाऱ्यांच्या प्रश्नावर लढणाऱ्या मराविमं अधिकारी संघटनेची वर्ष २०२३-२४ करिता नवी कार्यकारिणी निवडण्यात आली. प्रत्यक्ष व व्हिसी द्वारे राज्यभरातील ३२ पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नुतन अध्यक्ष श्री अजय गुळवे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

लातूर परिमंडळ कार्यकारिणीचे नुतन अध्यक्ष म्हणून लेखा व वित्त विभागाचे उपव्यवस्थापक श्री अजय गुळवे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तर सचिव पदी श्री अमोल अळंगे यांची निवड करण्यात आली. उर्वरीत कार्यकारिणी पुढील प्रमाणे निवडण्यात आले. उपाध्यक्षपदी श्री अभिजीत ढाकणे, कार्याध्यक्षपदी श्री आदित्य पाटील, सहसचिव लातूर मंडळासाठी श्री दिनेश ठाकूर, बीड मंडलासाठी बालाजी व्यवहारे, उस्मानाबाद मंडलासाठी श्री उमेश काळे तर कोषाध्यक्षपदी श्री ज्ञानेश्र्वर शेळके, महिला प्रतिनिधी म्हणून सौ.सविता पवार, प्रसिध्दी प्रमूख म्हणून श्री पवार तर सल्लागार म्हणून मानव संसाधनचे सहाय्यक महाव्यवस्थापक चंद्रकांत खाडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.



# महावितरणच्या झटपट वीज कनेक्शन मोहिमेचा एक महिन्यात आठ हजार ग्राहकांना लाभ

मुंबई : नवीन वीज कनेक्शन घेऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांना शहरी भागात चोवीस तासात तर ग्रामीण भागात ४८ तासात कनेक्शन देण्याच्या महावितरणच्या मोहिमेत राज्यात जुलै महिन्यात एकूण ८०६३ वीज ग्राहकांना झटपट कनेक्शन मिळाले . यामध्ये अर्ज केल्याच्या दिवशीच कनेक्शन मिळालेल्या ग्राहकांची संख्या ५१० असून ३७७५ ग्राहकांना शुल्क भरल्यानंतर २४ तासात कनेक्शन मिळाले . ग्रामीण भागात ६१६ ग्राहकांना अर्ज केल्यानंतर तातडीने शुल्क भरल्यामुळे ४८ तासात कनेक्शन मिळाले तर ३१६२ ग्राहकांना शुल्क भरल्यानंतर ४८ तासात वीज जोडणी मिळाली.

उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी महावितरणला दर्जेदार, गुणवत्तापूर्ण व ग्राहकाभिमूख सेवा देण्याची सूचना केली आहे. त्यानुसार महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी नव्या वीज कनेक्शनसाठीचे अर्ज तातडीने निकाली काढण्याचा आदेश दिला आहे. याचा भाग म्हणून महावितरणने जून महिन्यात दहा दिवसात एक लाख नवीन घरगुती वीज कनेक्शन दिली. आता नव्या कनेक्शनसाठी अर्ज करणाऱ्या ग्राहकांना शहरी भागात २४ तासात तर ग्रामीण भागात ४८ तासात वीज कनेक्शन देण्याचे काम कंपनीने सुरू केले आहे. महावितरणचे संचालक संजय ताकसांडे यांच्या मार्गदर्शनात ही मोहीम चालू आहे.

ग्राहकांनी नव्या वीज कनेक्शनसाठी अर्ज केल्यानंतर महावितरणचे कर्मचारी जागेची पाहणी करून किती शुल्क भरायचे याची माहिती देतात. त्यानुसार शहरी भागातील ज्या ग्राहकांनी शुल्क भरले त्यांना चोवीस तासात कनेक्शन देण्यावर भर देण्यात आला. राज्यभरात अशा एकूण ३७७५ ग्राहकांना जुलै महिन्यात लाभ झाला. महावितरणकडे अर्ज केल्यानंतर सूचना मिळाल्यावर तातडीने शुल्क भरणाऱ्या ५१० ग्राहकांना अर्ज केल्याच्या दिवशीच नवीन कनेक्शन मिळाले.

ग्रामीण भागासाठी अंतर व इतर अडचणी लक्षात घेऊन ४८ तासांचा कालावधी निश्र्चित करण्यात आला आहे. ग्रामीण भागात ज्या ग्राहकांनी तातडीने शुल्क भरले अशा ६१६ ग्राहकांना अर्ज केल्यानंतर ४८ तासात कनेक्शन मिळाले. तर अर्ज केल्यानंतर आपल्या सोयीने शुल्क भरल्यानंतर ४८ तासात कनेक्शन मिळणाऱ्या ग्राहकांची संख्या ३१६२ आहे.

कृषी ग्राहकांना वीज कनेक्शन देणे हे तुलनेने अवघड असते. शेतामध्ये दूरवर असलेल्या विहिरीवरील कृषी पंपासाठी वीज कनेक्शन देण्यासाठी विजेचा खांब, वायर, ट्रान्सफॉर्मर अशा पायाभूत सुविधा अनेकदा उभाराव्या लागतात. त्यामुळे शेतकऱ्यांनी अर्ज केल्यानंतर त्यांना जोडणी मिळण्यास विलंब लागतो. ही समस्या सोडविण्यासाठी महावितरणने गेल्या वर्षभरात मोहीम राबविली. त्यातून निर्माण झालेल्या पायाभूत सुविधांमुळे शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी कनेक्शन देण्याचाही वेग वाढला आहे. जुलै महिन्यात राज्यात १२२७ शेतकऱ्यांना झटपट वीज कनेक्शन मिळाली. त्यापैकी ७४ शेतकऱ्यांना अर्ज केल्याच्या दिवशीच तर ४९३ शेतकऱ्यांना शुल्क भरल्यानंतर २४ तासात वीज कनेक्शन मिळाले. अर्ज केल्यानंतर ४८ तासात कनेक्शन मिळालेल्या शेतकऱ्यांची संख्या ११७ आहे तर ५४३ शेतकऱ्यांना शुल्क भरल्यानंतर ४८ तासात कनेक्शन मिळाले.

# जिल्ह्यात स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्ष सांगता समारंभानिमित्त होणार विविध कार्यक्रमाचे आयोजन

लातूर : लातूर जिल्ह्यात गेल्या वर्षी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवजसा साजरा केला त्याच कार्यक्रमाच्या धर्तीवर महाराष्ट्र शासनाच्या ग्राम विकास व पंचायत राज विभागाने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवांतर्गत समारोपीय समारंभानिमित्त माझी माती -माझा देश अंतर्गत विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी दिली आहे. दिनांक ०८ ऑगष्ट ते १५ ऑगष्ट या कालावधीत स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या समारोपीय समारंभाच्या अनुषंगाने ग्रामपंचायत व पंचायत समिती स्तरावर राबविण्यात येणा-या विविध उपक्रमाचे दिन-निहाय सुक्ष्म नियोजन जिल्हा स्तरावरुन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील ७८६ ग्रामपंचायतीमध्ये त्याची काटेकोर अमंलबजावणी करावी. त्याचबरोबर राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमाचे फोटो, सेल्फी काढून लातूर जिल्हा परिषदेच्या merimatimeradeshlatur.in या पोर्टलवर तसेच ग्रामपंचायत व पंचायत समिती स्तरावर राबविलेल्या उपक्रमाचे फोटो व सेल्फी केंद्र शासनाच्या http:yuva.gov.in/merišmaatišmerašdesh या संकेत स्थळावर अपलोड करावेत असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी केले आहे.

दिनांक ८ ऑगष्ट २०२३ रोजी ग्रामसभेचे आयोजन जिल्हातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये करण्यात येणार असुन त्यामध्ये सांगता समारोहात राबविण्यात येणा-या उपक्रमाची चर्चा व नियोजन करणे हा विषय ठेवण्यात आलेला आहे. त्याचबरोबर स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या समारोपीय समारंभासाठीचे बॅनर्स व पोष्टर्स लावून जनजागृती तसेच प्रचार व प्रसिध्दी करण्यात येणार आहे. त्या दिवशी शाळेत चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे.

दिनांक ९ ऑगष्ट २०२३ रोजी वसुधा वंदन अंतर्गत शिक्षण विभागामार्फत प्रभात फेरीचे आयोजन करण्यात येणार आहे. त्याच दिवशी गावात प्रभातफेरी काढण्यात येणार असून एका कलशात माती गोळा करण्यात येणार आहे. हे उपक्रम ग्रामपंचायतीमार्फत राबविण्यात येणार आहेत. त्यामध्ये गावात प्रभातफेरीमध्ये एक लिटर आकाराचे कलशाची मिरवणुक काढून माझी माती - माझा देश या अभियानासाठी कलशामध्ये माती गोळा करणे ,अमृत सरोवर, शाळा व ग्रामपंचायतीमध्ये तयार केलेल्या शिलाफलकाचे स्वातंत्र्य सैनिक, माजी सैनिक व त्यांचे कुटुंबियाच्या हस्ते उदघाटन करणे,मातीचा दिवा हातात घेवून पंचप्राण शपथ घेणे व सेल्फी काढणे व शाळेत निबंध स्पर्धेचे आयोजन करणे यासारख्या उपक्रमाचा यामध्ये समावेश राहणार आहे.

दिनांक १० ऑगष्ट २०२३ रोजी पंचायत समिती स्तरावर सर्व गावातून माती कलश जमा करणयात येणार आहे. ग्रामपंचायत स्तर व पंचायत समिती स्तरावर किमान ७५ रोपांची अमृत रोपवाटीका तयार करणे.सर्व गावातील माती एकत्रीत करुन पंचायत समिती स्तरावर पाच लिटर आकाराचे दोन तांबे कलश तयार करणे व पंचायत समिती स्तरावर शिल्लक असलेले ध्वज नागरिकांना वितरीत करण्यासाठी ग्रामपंचायतीना देणे यासारखे उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

दिनांक ११ ऑगष्ट २०२३ रोजी वसुधा वंदन अंतर्गत ग्रामपंचायत स्तर व पंचायत समिती स्तरावर अमृतवन तयार करण्यासाठी किमान ७५ रोपांची लागवड करणे व त्याचबरोबर ग्रामपंचायत स्तरावर यावर्षी देण्यात आलेल्या उदिष्टा- प्रमाणे वृक्ष लागवड करणे असे उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

दिनांक १२ ऑगष्ट २०२३ रोजी गावपातळीवर शहीद, क्रांती इ. सारखे गावपातळीवर देशभक्तीपर चित्रपट प्रोजेक्टरवर दाखविण्यात येणार आहेत. पंचायत समिती स्तरावर जमा केलेले पाच लिटर आकाराचे दोन कलश जिल्हा स्तरावर पोहचविणे व प्रत्येक घरी ध्वजारोहण करण्यासाठी ग्रामपंचायतीकडे शिल्लक असलेले व पंचायत समितीकडून प्राप्त ध्वजाचे वितरण नागरिकांना करणे. इ उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

दिनांक १३ ऑगष्ट २०२३ रोजी गावपातळीवर घरोघरी तिरंगा हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. त्याचबरोबर गावपातळीवर शाळेत विविध क्रिडा स्पर्धाचे आयोजन करण्यात येणार आहे. नगर परिषद /पंचायत मार्फत आयोजित अमृत महोत्सवी मॅराथॉनमध्ये सहभाग नोंदविण्यात येणार आहे.

दिनांक १४ ऑगष्ट २०२३ रोजी गावपातळीवर 'घरोघरी तिरंगा ' उपक्रम राबविणे, गावपातळीवर सायंकाळी मशाल फेरीचे आयोजन करणे व स्वातंत्र्य लढयातील आठवणींना उजाळा देणे व जिल्हास्तरावर आयोजित मशाल फेरीच्या मुख्य कार्यक्रमात सहभाग नोंदविणे यासारख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

दिनांक १५ ऑगष्ट २०२३ रोजी गावपातळीवर घरोघरी तिरंगा उपक्रम राबविणे,पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर ध्वजारोहण करुन राष्ट्रगीत कार्यक्रमाचे आयोजन करणे, वीरांना वंदन अंतर्गत ध्वजारोहणानंतर गावातील सर्व स्वातंत्र्य सैनिक, वीर जवान व शहिद कुटुंबियांचा यथोचित सत्कार ग्रामपंचायतीमार्फत करणे, विविध शालेय स्पर्धेतील विजेत्या विदयार्थ्यांना बक्षीस देणे व शाळेत एक मुल एक झाड अंतर्गत वृक्ष लागवड कार्यक्रमाचे आयोजन करणे तसेच पंचायत समिती स्तर व ग्रामपंचायत स्तरावर 'एक कर्मचारी एक झाड ' उपक्रमांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करणे इ उपक्रम राबविण्यात येणार

# आईचे दुध बाळासाठी अमृत-डॉ. जमादार

लातूर : नवजात बालकाला स्तनपान देताना अनेक गैरसमज आहेत. परंतू स्तनपान दिल्याने बाळाबरोबरच मातेलाही खुप फायदे होतात. खऱ्या अर्थाने आईचे दुध बाळासाठी अमृत असून स्तनपानातून बाळाला रोगप्रतिकारक शक्ती प्राप्त होते त्याचबरोबर बाळाचे निकोप व सदृढ वाढ होण्यास मदत होते असे प्रतिपादन लातूर एमआयटीच्या वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एन.पी. जमादार यांनी केले.

दि.१ ते ७ ऑगस्ट दरम्यान जागतिक स्तनपान सप्ताह साजरा केला जातो. त्या अनुषंगाने लातूर येथील वैद्यकीय महाविद्यालयातील बालरोग विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात अधिष्ठाता डॉ. एन.पी. जमादार बोलत होते. या कार्यक्रमास शैक्षणिक संचालक डॉ. चंद्रकांत शिरोळे, शैक्षणिक व प्रशासकीय संचालिका डॉ. सरिता मंत्री, रूग्णालय अधिक्षक डॉ. माले, लातूर वैद्यकीय महिला शाखेच्या अध्यक्षा डॉ. प्रिती बादाडे, सचिव डॉ. प्रियंका राठोड, डॉ. कापसे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून जागतीक स्तनपान सप्ताह कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. बालरोग विभागाच्या प्रमुख डॉ. विद्या कांदे यांनी कार्यक्रमाच्या आयोजना मागची भुमीका विशद करून यावर्षीचे स्तनपान सप्ताहाची स्तनपान सक्षमीकरण, व नौकरी करणाऱ्या महिलांसाठी विशेष बदल ही थीम असल्याचे सांगीतले.

स्तनपानाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि आरोग्य सुधारण्यासाठी दरवर्षी स्तनपान सप्ताह साजरा केला जातो असे सांगून यावेळी बोलताना डॉ. जमादार म्हणाले की, जी मुले आपल्या आईचे दिर्घकाळ दुध पितात त्या मुलांची रोगप्रतिकारक शक्ती खुप मजबूत असते ते सर्व प्रकारच्या रोगाशी सहज लढण्यास सक्षम होतात. तेव्हा स्तनपानाबाबतीत महीलांत असलेले गैरसमज दूर व्हावेत असे बोलून दाखविले.

डॉ. चंद्रकांत शिरोळे यावेळी बोलताना म्हणाले की, जगात सर्वात श्रेष्ठ जर काय असेल तर आईची माया व आईचे दूध आहे. तर डॉ.सरीता मंत्री यांनी या कार्यक्रमात स्तनपानाचे मातेला व बाळाला होणारे फायदे याबद्दल प्रबोधन केल. बाळ जन्मल्या जन्मल्या अर्ध्या तासाच्या आत छातीवरचे दूध पाजणे आणि पहिले सहा महिने फक्त आईचेच दूध देणे कसे महत्वाचे आहे, याबद्दल सविस्तर माहिती डॉ. प्रिती बादाडे यांनी देवून नोकरी करणाऱ्या महिलांसाठी स्तनपान यशस्वी करण्यासाठी मदत करणे गरजेचे आहे. हिरकणी कक्ष म्हणजे काय? हे नाव का देण्यात आले याबदल सखोल माहिती दिली. तसेच डॉ. प्रियांका राठोड यांनी स्तनपान करणाऱ्या मातांमध्ये कर्करोगाचे प्रमाण कसे कमी आहे याबाबत सविस्तर सांगितले. डॉ. सागिर पठाण यांनी स्तनपान बद्दल असलेल्या गैरसमज याबदलची माहिती दिली तसेच डॉ. माले यांनी स्तनपानबदलची महिलांत जनजागृती करावी असे सांगितले.

ज्या मातेला स्तनपानाचे योग्य ज्ञान आहे अशा मातांचे अभिनंदन करून डॉ. शिल्पा दडगे यांनी डब्लूएचओची स्तनपान यशस्वी होण्यासाठीची प्रतिज्ञा सर्व डॉक्टर्स व वैद्यकीय कर्मचारी, उपस्थितांना दिली. या कार्यक्रमास डॉ. शैला सोमाणी, डॉ. प्रतिभा केंद्रे, डॉ. संजीवनी तांदळे, डॉ. शीतल शेळके, डॉ. कल्पना जाजू, डॉ. शीतल बाहेती, डॉ. रश्मी अकुस्कर वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थी, नर्सिंग स्टाफ मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बालरोग विभागातील डॉ. शिल्पा दडगे, डॉ. मंगेश डाके, डॉ. शीतल भट्टड, डॉ. दीपिका भोसले तसेच निवासी डॉ. अभिषेक, डॉ. अंकिता, डॉ. संकेत, डॉ.स्नेहा, डॉ. निकिता यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ. अंकिता चव्हाण, तर शेवटी डॉ. संकेत राजूरकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.



# महसूल सप्ताह : १२७ अधिकारी, कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी

लातूर : लातूर तहसील कार्यालयामार्फत महसूल सप्ताह निमित्त तहसील कार्यालयातील १२७ अधिकारी, कर्मचारी यांची आरोग्य तपासणी, व्यसनमुक्ती, मानसिक आरोग्य समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिराचे उद्घाटन अतिरिक्त जिल्हाधिकारी सुनील जी. यादव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे -विरोळे, प्रभारी तहसीलदार गणेश सरोदे, नायब तहसीलदार भीमाशंकर बेरोळे, मंडळ अधिकारी खंदाडे, तलाठी तावशीकर, यांच्या सह कर्मचारी उपस्थित होते.

या शिबिरासाठी ४ डॉक्टर आणि त्यांची टीम असे २७ जण होते. त्यात कव्हा आरोग्य प्राथमिक केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. माया कापसे, समुदाय अधिकारी डॉ. किरण कऱ्हाळे, चिखुर्डा प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्य अधिकारी डॉ. तोरणेकर एस.बी., मुरुड आकोलाचे समुदाय अधिकारी डॉ. वर्षा गव्हाणे, खोपेगावचे सीएसचओ चंद्रकिशार जाधव, आरोग्य सहाय्यक यादव डी.एम., श्री. स्वामी, श्री. कदम विलास, श्री. नरहरे , निर्मिती जाधव व एच.एच.एल.टीम, श्री. कांबळे बी.एल. आदी उपस्थित होते.

# समाज कल्याण क्षेत्रात विशेष कार्य करणाऱ्या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था, समाजसेवक यांना मिळणार पुरस्कार

लातूर : समाज कल्याण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था व समाजसेवक यांना दरवर्षी विविध पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. त्यानुसार सन २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ व सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारासाठी १५ ऑगस्ट २०२३ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

सन २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ या वित्तीय वर्षासाठी यापूर्वी अर्ज केला असल्यास नव्याने अर्ज करण्याची आवश्यकता नाही. मात्र, चालू वर्षासाठीचे पोलीस विभागाचे चारित्र्य पडताळणी अहवाल तत्काळ समाज कल्याण सहायक आयुक्त कार्यालयाकडे सादर करावा. पूर्वी अर्ज केलेल्या व्यक्तींनी पुन्हा अर्ज केल्यास त्या अर्जाचाही विचार करण्यात येईल. ज्या वर्षांसाठी व ज्या पुरस्कारांसाठी अर्ज करण्यात येत आहे, त्या वर्षासाठी त्या पुरस्कारासाठी विहित केलेल्या अटींची पुर्तता करणे आवश्यक राहील. तसेच पुरस्कारासाठी ०१ जानेवारी ते ३१ डिसेंबर अशी गणना विचारात घेण्यात येईल. इच्छुक संस्था व व्यक्ती यांनी पुरस्कारासाठी सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाकडे दिनांक १५ ऑगस्ट २०२३ पर्यंत अर्ज करावेत. विहीत नमुन्यातील अर्ज सहायक आयुक्त, समाज कल्याण, लातूर यांच्या कार्यालाय्त उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी समाज कल्यानण निरिक्षक संदेश घुगे (भ्रमणध्वनी क्र. ९४०५४४६२१६), तालुका समन्वयक गंगाधर जोगदंड (भ्रमणध्वनी क्र. ७६२००१९४८४) यांच्यामशी अथवा कार्यालयाच्या ०२३८२-२५८४८५ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त यांनी केले आहे.

**महाराष्ट्र शासन**

**सा. बां. विद्युत विभाग उस्मानाबाद**

**ई-निविदा सुचना क्रमाक (०४) सन २०२३-२०२४**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग उस्मानाबाद (दुरध्वनी क्र. ०२४७२-२९९४३१) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे मागवित आहेत. सदरील निविदेमध्ये ४ काम समाविष्ट असून या निवेदे अंतर्गत संपूर्ण माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१. उपरोक्त एकत्रीत कामांची निविदा किंमत रूपये १.०० कोटी पेक्षा अधीक आहेत.

२. या निविदेसंबंधी संपूर्ण माहिती खाली दिलेल्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच यापुढील सर्व बदलांची माहिती या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

https://mahatenders.gov. in

स्वाक्षरीत/-
**कार्यकारी अभियंता,**
सा. बां. विद्युत विभाग,
उस्मानाबाद

## CHANGE OF NAME

I have change my name from **KUNJOOR KARUNAKAR SHETTY TO KARUNAKARA MUJIKRA SHETTY** Hence for this declaration in future I will use this name **KARUNAKARA MUJIKRA SHETTY** in future the same name will be used by my children and all family.

**Old Name :- KUNJOOR KARUNAKAR SHETTY**
**New Name :- KARUNAKARA MUJIKRA SHETTY**
**Address : Behind Deshikendra School Signal Camp, Latur-413512**

## CHANGE OF NAME

I have change my name from **SHETTY SUHAS KARUNAKAR TO SHETTY SUHAS KARUNAKARA** Hence for this declaration in future I will use this name **SHETTY SUHAS KARUNAKARA** in future the same name will be used by my children and all family.

**Old Name :-SHETTY SUHAS KARUNAKAR**
**New Name :-SHETTY SUHAS KARUNAKARA**
**Address : Behind Deshikendra School Signal Camp, Latur-413512**

## CHANGE IN NAME

I have change my name from **NIKHATH NASREEN MOHAMMAD ESA KHAN TO SHAIKH NASREEN MUSTAFA** hence forth this decleration and will be known by this name i will use **SHAIKH NASREEN MUSTAFA** future the same name will be used by my wife children and family.

**Old Name :- NIKHATH NASREEN MOHAMMAD ESA KHAN**
**New Name :- SHAIKH NASREEN MUSTAFA**
**Address : Khori Galli, Maheboob Nagar, Latur (M.S.) 413512**

## CHANGE OF NAME

I HAVE MY NAME **SAYED ASIF SAYED AZIZ** HENCEFORTH THIS DECLARATION AND WILL BE KNOWN BY THIS NAME AND I WILL USE **SYED ASIF AZIZ** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY WIFE AND CHILDREN DOCUMENTS.

**OLD NAME : SAYED ASIF SAYED AZIZ**

**NEW NAME : SYED ASIF AZIZ**

**ADDRESS** : BEHIND AMIRI MASJID KILLA GALLI UDGIR DIST LATUR-413517


छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री
कलर प्रिंट/झेरॉक्स
B/W प्रिंट/झेरॉक्स
जम्बो झेरॉक्स/प्रिंट
डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो
रिफीलींग/टोनर/फोटो पेपर
लॅमिनेशन मशिन व मटेरिअल
झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :
बोरा झेरॉक्स
व्यापारी धर्मशाळा, महात्मा गांधी चौक, लातूर.
9673344777

श्री.तिरुपती
ट्रेडींग कंपनी
शिवाजी चौक,
निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:-दु. २४२४६३,
मो.९४०४६८२९९९



SINCE 1972
माळवदकर एजन्सीज
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते